# अमृत कुंभ



वर्ष १६ | अंक ४ | ऑक्टोबर - नोव्हेंबर २०२२ | मूल्य रु. १३/-



शांतीवन (आबू रोड) : महाराष्ट्र विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेता भ्रा. अंबादास दानवे यांस ईश्वरी भेटवस्तू देताना राजयोगिनी दादी रतनमोहिनी सोबत ब्र.कु. लीला, ब्र.कु. दीपक हरके व अन्य



घाटकोपर : राज्यपाल भ्रा. भगत सिंह कोश्यारी यांना राखी बांधताना ब्र.कु. शकू, रुक्मिणी व ब्र.कु. वंदना



मुलुंड : रक्षाबंधन निमित्त वरिष्ठ पोलिस निरीक्षक भ्रा. कोथिंबीरे यांना राखी बांधताना ब्र.कु. वर्षा



देऊळगावराजा : आझादी का अमृत महोत्सव कार्यक्रमानिमित्त ध्वजारोहण करताना ब्र.कु. सुनंदा व अन्य.



गोराई, बोरीवली : रक्षाबंधन निमित्त आमदार भ्रा. सुनील राणे यांना राखी बांधताना ब्र.कु. पारुल



सांगली : आत्मनिर्भर किसान अभियान कार्यक्रमात ब्र.कु. निवेदिता, ब्र.कु. पद्मा यांचा सत्कार करताना सभापती शुभांगी प्रकाश पाटील व उपसरपंच शुभांगी बाजीराव पाटील.

परमपिता परमात्मा त्रिमूर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव'।

# अमृत कुंभ

## अंतरंग

वर्ष १६, अंक ४. ऑक्टोबर – नोव्हेंबर २०२२

### मुखपृष्ठाविषयी

दिवाळी म्हटले की सर्वत्र आनंदीआनंद. आपल्या संस्कृतीने प्रत्येक सण, मानवास उत्साही करण्यासाठीच योजला आहे. पण आनंदाचे आणि उत्साहाचे उधाण दिवाळीच्या निमित्ताने पहायला मिळते. आत्मा अजर, अमर आहे हे आपण जाणतो. आत्मारूपी दिव्यात पवित्रतेचा प्रकाश किंवा ज्योत तेवत रहावी याकरिता ज्ञानाचे घृत आवश्यक असते. ज्योत तेवत रहावी याकरिता परमात्म ज्योतीशी योग साधणे म्हणजेच खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी करणे. अशा अलौकिक दीपोत्सवाच्या निमित्ताने आपणां सर्वांना भरभरून शुभेच्छा!

– प्रकाशिका




| | | |
|---|---|---|
| १. | संपादकीय –भ्रष्टाचार आणि समाज | २ |
| २. | कर्मबंधनमुक्त स्थिती | ४ |
| ३. | दृष्टी पलीकडची सृष्टी (भाग २) | ५ |
| ४. | प्रभु प्रेमिका : दादी ऑलराऊण्डरजी ! | ८ |
| ५. | चिंतन – चित्तक्षोभ | १२ |
| ६. | माझे मनोगत | १३ |
| ७. | परीकथा (भाग – ६) | १५ |
| ९. | जेथे श्रवणाचा उपाये | १७ |
| १०. | प्रकाशवाटा (भाग – १) | १८ |
| ११. | माझे सर्वस्व – बाबा | १९ |
| १२. | शब्दरूपी दौलत | २१ |
| १३. | योगक्षेमं वहाम्यहम् । | २२ |
| १४. | काळ सार्थकचि लावावा | २५ |
| १५. | क्रोध | २७ |


**फोटो, लेख इत्यादी पाठविण्याचा पत्ता :**
संपादक – अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए–१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व)–४००६०३
फोन : ०२२–२५३२२२०८
E-mail : info@amrutkumbh.com

**वर्गणी पाठविण्याचा पत्ता :**
ब्र. कु. गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ
द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए–१०, वर्षा अपार्टमेंट,
छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी,
ठाणे (पूर्व) – ४००६०३ मोबाईल : ९८२००२३०९२

Printed, published by B.K.Godavari on behalf of Prajapita Brahmakumaris Ishwariya Vishwa Vidyalaya. Printed at Perfect Prints 22, Jyoti Industrial Estate, Nooribaba Dargah Road, Near Makhmali Talao, Thane (west), pin 400601. Published at Prajapita Brahmakumaris Light House, Wagle Estate, Thane (west), Pin - 400604, Maharashtra. Editor : Mr. Sachin Vinayak Upadhye.

वार्षिक वर्गणी रु. ७५/–, आजीव सभासद वर्गणी रु. १,४००/–

E-magazine साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या – www.amrutkumbh.com.



संपादकीय ...

# भ्रष्टाचार आणि समाज

सध्या महाराष्ट्रात सगळीकडे भ्रष्टाचार आणि त्यात अडकलेले राजकारणी याबद्दलची चर्चा जोरात आहे. तसं म्हटलं तर केवळ महाराष्ट्रच नाही तर दिल्ली, प.बंगाल आणि इतर राज्यातही भ्रष्टाचार या विषयाने हलकल्लोळ माजवला आहे. एखादा राजकीय पक्ष प्रतिस्पर्ध्यावर आरोप-प्रत्यारोप करतो आणि हा धुरळा उडतच राहतो. सर्वसाधारणपणे विकसनशील देशात भ्रष्टाचाराचे प्रमाण फार आहे असे मानले जाते. भ्रष्टाचार म्हणजे पैशाचा अपव्यवहार असे आपण मानतो. याचे मूळ कशात आहे तर लोभात. सरसकट सगळीच माणसे पाच विकारात गुरफटलेली आढळतात. प्रमाण कमी-जास्त असू शकते; पण या विकारांचा प्रभाव मात्र सगळ्या जगतावर आहे. मोह आणि लोभ म्हणजे काय? मराठी बोलीभाषेत आपण म्हणतो 'मला खाण्या-पिण्याचा मोह आहे' किंवा पूर्वी पत्रात लिहीत असत 'कळावे लोभ असावा' म्हणजे प्रेम असावे याअर्थी. मात्र अध्यात्माच्या दृष्टीकोनातून विचार केला तर धन- वस्तूंचा हव्यास म्हणजे लोभ आणि व्यक्तींबद्दलचे आकर्षण म्हणजे मोह. अर्थात कुटुंब-कबिला, पुत्रादी नाते संबंधात मन-बुद्धी गुंतणे म्हणजे मोह आणि धन, जमीन-जुमला यात अडकून पडणे म्हणजे लोभ असे ढोबळमानाने म्हणता येईल. २०२० च्या एका सर्वेक्षणानुसार डेन्मार्क, फिनलंड, न्यूझीलँड सिंगापूर असे देश कमीत कमी भ्रष्ट आचरण करणाऱ्या लोकसंख्येचे देश आहेत. हे देश पहिल्या पाचात म्हणजे सर्वात कमी भ्रष्टाचार असलेले देश आहेत, तर भारत ८५ व्या क्रमांकावर आहे. अनेक गोष्टीत जपान एक चांगला देश आहे; पण अशा सर्वेक्षणात जपानही दहाच्या पुढील क्रमांकावर आहे. काही वर्षांपूर्वी जपानचे 'ताकेशीता' नावाचे पंतप्रधान भ्रष्टाचाराच्या आरोपात गोवले गेले होते. अगदी अलीकडची घटना - ८ जुलै २०२२ ला 'पंतप्रधान शिंजो आबे' यांची हत्या झाली. जपानसारख्या राष्ट्रालाही भ्रष्टाचार, हिंसाचार अशा असुरांनी घेरलेले आहेच. म्हणजे चंद्रालाही डाग आहेतच.

काही महिन्यांपूर्वी 'रीडर्स डायजेस्ट' या नियतकालिकाने केलेल्या सर्वेक्षणाविषयीची माहिती इतर माध्यमांद्वारे फिरत होती. त्या सर्वेक्षणानुसार प्रामाणिकपणात 'मुंबई' दुसऱ्या क्रमांकावरचे शहर दिसून आले. काय केले 'रीडर्स डायजेस्टने'? पन्नास यूएस डॉलर्स पाकिटात घालून वेगवेगळ्या शहरात जाणीवपूर्वक गहाळ केले. एका शहरात १२ पाकिटे अशी जगभरातील १६ शहरात मिळून १९२ पाकिटे गहाळ केली. अशा पाकिटात पैसे, थोडी काही कागदपत्रे असे ठेवण्यात आले आणि मिळालेले पाकीट किती लोकं परत करतात ते नोंद केले. 'फिनलँड'मधील हेलसिंकी शहरात बारापैकी अकरा पाकिटे परत आली आणि मुंबईत नऊ. म्हणजे गोंधळात टाकणारे निष्कर्ष आपल्यासमोर येतात. एका सर्वेक्षणात भारत फारच पिछाडीवर आहे तर दुसरीकडे फार पुढे आहे. निदान भारतातले एक शहर पुढे आहे असे म्हणूयात.

दूध, अन्नपदार्थ, खाद्यतेल अशा अनेक गोष्टीतही भेसळ होते आणि त्यालाही एक प्रकारचा भ्रष्टाचार म्हणतात. तयार खाद्यपदार्थ विकले जातात त्यातही घातक रंग वापरतात, पंचतारांकित हॉटेलात शिळे अन्न कसे वापरले जाते यावरही अनेक माध्यमातून वेगवेगळी माहिती उजेडात येते. साररूपात सांगायचे झाले, तर जे योग्य आहे, नियमानुसार आहे ते सोडून, जे काही केले जाते त्याला भ्रष्टाचार म्हटले जाते.

आध्यात्मिक पातळीवर विचार केला, तर गांधीजींचे एक वाक्य आठवते Earth provides enough to satisfy every man's needs, but not every man's greed.

म्हणजे मानवाच्या लोभाला परिसीमा नाहीत. पण फक्त लोभवृत्ती म्हणजे भ्रष्टाचार नव्हे, तर कुठल्याही विकाराधीन केलेले कृत्य म्हणजे भ्रष्टाचार. काम क्रोधाविषयी ज्ञानेश्वरांनी सांगितले आहे, 'तरी हे काम क्रोधु पाहीं । जयाते कृपेची साठवण नाही । ते कृतांताचा ठायी । मानिजती' (ज्ञाने. अ. ३, ओवी २४०). म्हणजे काम क्रोधादि विकार इतके निर्दय आहेत की त्यांच्या ठायी दयेचे नाव-निशाणही नाही जणू ते यमधर्मच आहेत. हे विकार ज्ञानरूपी ठेव्यावर असलेले सापच आहेत.

मनुष्यात्म्याचा मूळ धर्मच पवित्रता आहे. आत्म्याचे सात गुण अर्थात् पवित्रता, सुख, शांती, प्रेम, आनंद, शक्ती आणि ज्ञान मूलभूत आहेत. आपण रोजच्या जीवनात या गुणांचा अनुभवही करतो; मात्र त्या अनुभवासाठी भौतिक साधने किंवा मर्त्य जीवांचा आधार घेतो. कसे ते पहा. आनंदप्राप्तीसाठी कुणी टीव्हीवर क्रिकेटचा सामना पाहतो, तर कुणी बातम्या पाहतो. कुणी खेळ खेळतं तर कुणी वाचनात मन रमवतं. म्हणजेच काय तर भौतिक साधनांच्याद्वारे आनंदप्राप्ती केली जाते. गल्लत कुठे होते? भौतिक साधने विनाशी आहेत. त्यामुळे त्यातून होणारी अनुभूतीही अल्पकालीन आहे. म्हणजे सतत टीव्ही पाहू शकत नाही. असाच प्रकार माणसाच्या एकमेकांबद्दलच्या व्यवहारात घडतो. भावनेचे आदान-प्रदान होते. एकमेकांबद्दलचे प्रेम अनुभवास येते; पण स्वतःला देह समजण्याने शुद्ध प्रेमाची जागा मोह घेतो. यातून दुःखाची प्राप्ती होते. मग आपण वेगवेगळ्या नाते संबंधात या सात गुणांच्या अनुभवाचा शोध घेत राहतो.

हे सात गुण हीच आपली मूळ प्रवृत्ती आहे किंवा आपला धर्म आहे. इथे धर्म या शब्दाचा अर्थ धारणा असा आहे.

'धारणाद्धर्ममित्याहुर्धर्मोधारयते प्रजाः' या उक्तीनुसार धारणा हा अर्थ अभिप्रेत आहे. जन्माने हिंदू, ख्रिश्चन इत्यादी दैहिक धर्म इथे विचारात घेतला नाहीय. अशा सात गुणांना सोडून जेव्हा पाच विकारांच्या अधीन कर्म घडते तेव्हा ते भ्रष्ट आचरण म्हटले जाते. तो खरा भ्रष्टाचार आहे. अगदी सूक्ष्म पातळीवर जाऊन विचार केला, तर एखाद्याविषयी मनांत रागाची भावना जरी ठेवली तरी मूळच्या शांतता या गुणांपासून किंवा धर्मापासून भ्रष्ट होऊन आपण विचार करतो. म्हणजे एक प्रकारे माणूस धर्मभ्रष्ट आणि त्यामुळे कर्मभ्रष्ट होतो. म्हणजेच आध्यात्मिक भाषेत भ्रष्ट आचरण केले. इतका गहन विषय आहे हा. याच प्रकारे दैहिक दृष्टीतून मी पुरुष आहे, किंवा स्त्री आहे या भावनेतून बघणे म्हणजे स्वतःच्या आत्मभानाचा विसर पडणे आणि हीच सूक्ष्म कामप्रवृत्ती आहे. यावरच विजय मिळवणे हे अध्यात्माचे प्रयोजन आहे. एकदा या दिशेने वाटचाल सुरू झाली की स्थूलरूपात असलेला लोभ, मोह या विकारांच्या अधीन होऊन जो पैशाचा भ्रष्टाचार केला जातो तो आपोआपच समूळ नष्ट होईल. अध्यात्म म्हणजे अल्पसंतुष्ट होणे, मन मारून जगणे आहे का? अजिबातच नाही ! जेव्हा आपण आत्मभानाचा अभ्यास करू लागतो तेव्हा आत्मानंदाची अनुभूती सुरू होते. हा आनंद अल्पकालीन नसतो, त्यामुळे भौतिक साधने आणि इतर माणसांवर अवलंबून हा आनंद नसतो. आध्यात्मिक मनुष्य भौतिक साधने वापरतो; पण त्यात गुंतून राहत नाही. उदाहरणच द्यायचे झाले तर आध्यात्मिक प्रवृत्तीची व्यक्ती विमानाने प्रवास करते; पण विमानप्रवास म्हणजे स्टेट्स सिम्बॉल अशा भ्रामक समजुतीत गुंतत नाही किंवा विमानप्रवासात मला 'बिझनेस' क्लासचेच तिकीट हवे हा आग्रह म्हणजे लोभ झाला, आसक्ती आली.

आपण देह नाही, आत्मा आहोत हे खरं तर बहुतेक सगळे जण जाणतात. मात्र त्याचा अभ्यास नाही अशी परिस्थिती आहे. या देहापासून मी वेगळा आहे याचा अनुभव नसतो, फक्त माहिती असते. ज्ञान आणि माहिती यात फार मोठा फरक आहे, ज्ञान हे अनुभवावर आधारित असते आणि माहिती बऱ्याचदा बाह्य स्रोतांवर आधारित असते. त्यामुळे परमात्मा शिव आपल्याला सर्वप्रथम आत्म्याविषयी अचूक ज्ञान देतात. त्याच्या आधारे पवित्रता हा मूळ धर्म अंगीकारणे सोपे होते. पवित्रता, सुख- शांतीची जननी असल्याकारणाने त्यातून सुख, शांती, प्रेम आणि आनंदाची अनुभूती होते. स्वतःला आत्मा समजून परमात्म्याची आठवण करणे म्हणजे राजयोग आहे. राजयोगाद्वारे शक्तीची प्राप्ती होते. शक्ती प्राप्त झाल्याने परिवर्तन शक्य होते.

समाजातल्या सर्वच थरातल्या लोकांनी अशा साधनेची कास धरणे आवश्यक आहे. अनेकदा लोकं म्हणतात या अध्यात्माची गरज म्हाताऱ्या मंडळींना आहे किंवा राजकारण्यांना याची सगळ्यात जास्त गरज आहे.

(पृष्ठ क्र.१६ वर)



# “कर्मबंधनमुक्त स्थिती”

ब्र. कु. शिवानी, दिल्ली

मानवी जीवनाचे अनेकविध पैलू आहेत. त्या सर्वांचा विचार केला तर आपल्या लक्षात येईल की या विविध घटना घडण्यामागे आपण जी काही कर्म करतो, ती जबाबदार आहेत. मग ती चांगली कर्म असोत वा वाईट, त्या सर्वांचे फळ भोगावेच लागते. हा झाला कर्मसिद्धांताचा भाग ! या कर्मांची सुद्धा देणीघेणी आहेत जी आपल्याला पुढच्या जन्मी किंवा याच जन्मात सुद्धा अनुभवयास मिळतात. ज्यामुळे आपले मानसिक स्वास्थ्य वा संतुलन बिघडते. आता या मानसिक स्वास्थ्याचे/संतुलनाचे नियंत्रण आपल्या हातात आहे. आपण या जन्मात केलेल्या चुका फक्त आपल्या लक्षात असतात; पण मागील अनेक जन्मांच्या चुकांचा आपल्याला काही थांगपत्ताच नसतो. मग अचानक एखादी वाईट गोष्ट आपल्या बाबतीत घडली तर त्याचा आपण इतका बडेजाव करतो की अशी घटना ही कधी कोणाच्या आयुष्यात घडलीच नाही तर ती फक्त आपल्याच बाबतीत घडत आहे असे वाटते. आपण मागील जन्मी जसे प्रत्येकाशी वागलो आहोत. त्याचीच तर परतफेड आता होत आहे हे लक्षात यायला हवे. दोन गोष्टींद्वारे आपण आपल्या समोरील घटनेकडे बघायचे आहे. एक म्हणजे जीवन हे वर्तमानात जगायला शिकले पाहिजे ना की भूतकाळात. जे काही घडत आहे त्यावर आपण आपल्या भावनांचे नियंत्रण ठेवले, तर मोठ्या प्रमाणात गोष्टी सुरळीत व्हायला मदत होते. तसेच आता आपल्याला दुसऱ्याचे वाईट जरासुद्धा चिंतायचे नाही हे लक्षात ठेवायला हवे. आपली कर्म ही प्रत्येकाप्रती सुंदर आणि स्वच्छ, उदात्त भावनेनेच असली पाहीजेत. दुसऱ्याने मला दुखावले म्हणून मी ही त्याच प्रकारे त्याच्याशी वागणे ही झाली कर्मबंधनात अडकण्याची गोम! पण जर या बंधनातून सुटायचे असेल तर नकारात्मक दृष्टीने त्या गोष्टीकडे न बघता सकारात्मक दृष्टिकोन अंगीकारला तर आपल्या लक्षात येईल की त्याला माफ केल्याने, माझ्या मनात त्याच्याविषयी काहीच उलटसुलट विचार उमटत नाहीत. आपसूकच मी त्या बंधनापासून मोकळा होत आहे. दुसऱ्याचा जरासुद्धा विचार आपल्या चित्तपटलावर आणू न देणे ही खरी कला आहे. त्यासाठी चांगल्या संस्कारांची जोपासना करणे आवश्यक आहे. आपण आपल्या जुन्या संस्कारांपासून सहजासहजी सुटू शकत नाही; पण आपल्या बुद्धीद्वारे आपण योग्य निर्णय करू शकतो. हे तेव्हाच घडेल जेव्हा परमात्म्याची साथ मिळेल !

त्या परमात्म्याच्या चिंतनाद्वारे आपण आपल्या अंगी विशिष्ट गुण व शक्तींची जोपासना करू शकतो. त्याद्वारे आपली सहनशक्ती वाढून दुसऱ्याला सामावून घेण्याची वृत्ती आपल्या अंगवळणी पडेल. ज्याद्वारे एखादी वाईट गोष्ट सहजरीत्या आपण सोडू शकतो किंवा त्या गोष्टीचा माझ्या मन:शांतीशी काडीमात्रही संबंध राहत नाही. जेणेकरून आपोआपच माझी दुसऱ्याशी असलेली कार्मिक बंधने गळून पडतील. माझी स्थिती चांगली असेल तर तशी माझी वृत्ती व कृती घडेल. दुसऱ्याला ठीक करण्यापेक्षा स्वत:च्या स्थितीवर लक्ष द्यायला हवे. स्वत: आपल्याला नियंत्रणात, संयमात ठेवायला शिकाल तर कोणतीही परिस्थिती, व्यक्ती आपले कधीच वेडेवाकडे करू शकणार नाही. उलटपक्षी, आपल्या शांत, संयमी वृत्तीने दुसऱ्याचेही मत परिवर्तन व्हावसास मदत मिळेल. तसेच जर अन्य दोन व्यक्तींमध्ये काही वादविवादास्पद घटना आपल्या समक्ष घडत असेल, तर ज्या व्यक्तीबरोबर वाईट घडले आहे. त्याला सहाय्य करणे, त्याला सावरणे ही आपली जबाबदारी आहे. वाईट करणाऱ्या व्यक्तींचा विचारसुद्धा आपल्या मनात करणे हे जिकरीचे काम आहे. त्याच्या प्रती जरासुद्धा नाराजी, घृणा असता कामा नये. आपले चित्त साफ ठेवणे आवश्यक

(पृष्ठ क्र.२० वर)



# दृष्टी पलीकडची सृष्टी

(भाग – २)

ब्र.कु. प्रफुल्ल, मीरा सोसायटी, पुणे

आई सांगते की दर एक दोन महिन्यांनी तुझा चष्मा तुटायचा, डोकं फुटायचं. मी खूप कळवळायचो. कुणी दगड मार, कुणी शिव्या दे – असं काही झालं की खूप निराश व्हायचो, वाटायचं मी असा का आहे बरं! सहावीत गेल्यावर मला थोडं कळायला लागलं की इतरांसारखा मी बघू शकत नाही. सर्वजण जशी कामे करतात, खेळ खेळतात, मी तसं काही करू शकत नाही. शाळेत पीटी चा तास असला की, मैदानावर एकटाच कुठेतरी बसायचो. ह्या सर्व गोष्टीत मला भाग घेता येत नसे. त्यामुळे आत्मविश्वास कमी होत गेला. परंतु ११ वी ला मला जेव्हा बाबांचं ज्ञान मिळालं, तेव्हा हळूहळू आत्मविश्वास वाढायला लागला. समजले, मी तर एक आत्मा आहे. शरीर नाही आणि बाकीही लोक आत्माच आहेत. बाबांची मुलं आहेत. मग हळूहळू ज्ञानमुरलीत येणाऱ्या स्वमानांचा अभ्यास करायला लागलो. मी दिव्य आत्मा, अविनाशी आहे, सौभाग्यशाली आत्मा आहे. हे आणि यांसारखे अनेकानेक स्वमान – (स्वमान अर्थात् उच्च श्रेणीचे आत्मभान)

कॉलेजातही मस्तीखोर मुलं खूप शिव्या द्यायची, चिडवायची. पण स्वमानाच्या अभ्यासामुळे आपसूकच दोन गोष्टी झाल्या. मला छळणारे गायब झाले. वाईट बोलणारे लोक अचानक दूर निघून गेले किंवा त्यातीलच काही मला आदराने वागवू लागले.

मला कळले की आपण ज्या नजरेने स्वत:कडे बघतो, लोकही आपल्याला तशाच नजरेने बघतात. जर मी स्वत:ला म्हटले की मी तर हिम्मतहीन आहे. माझ्यात धमकच नाही, मी ह्या गोष्टीस लायक नाही, मला जमणारच नाही. तर लोकही आपल्याकडे अशाच दृष्टीने बघतात. पण स्वमानाने दुनिया कशी जादूसारखी बदलते, हे अनुभवले आणि राजयोगाची कमाल कळली.

आमचा ७ दिवसांचा कोर्स झाला आणि सकाळचे कॉलेज असल्याने मी सेंटरला ७ च्या क्लासला जायचे बंद केले. तरी आई–बाबा न चुकता जायचे. एक दिवस दीदींनी विचारलं, की तुम्ही दोघेच येता. तुमची मुले का येत नाहीत बरे. त्यांनी शाळा–कॉलेज असल्याने येत नाहीत असे सांगितले. दीदींनी रविवारी क्लासला या असे म्हटल्याने मी दर रविवारी जाऊ लागलो. रविवारी अव्यक्त मुरली असते ती समजायला कठीण असल्याने क्लासमध्ये मला झोप यायची, मजा नाही वाटायची. एक दोन रविवार जाऊन मग मी जाणे बंद केले. दीदीने पुन्हा विचारताच आई बाबांनी खरे काय ते सांगितले, मुरली समजतही नाही. त्यामुळे मजा येत नाही, झोप येते. तेव्हा दीदींनी संध्याकाळच्या क्लाससाठी आमंत्रण दिले. त्यावेळी २०–२५ कुमार असायचे संध्याकाळच्या क्लाससाठी समवयस्क असल्याने मला आता मुरलीत करमायला लागले. मुरली स्पष्टीकरण, विचारांची देवाण–घेवाण व्हायची. सकाळपेक्षा संध्याकाळी भाऊ–बहिणी निवांत असायचे. त्यामुळे मीही मन लावून मुरली ऐकायला लागलो, क्लासमध्ये माझे लक्ष असे. स्वमानाचा अभ्यास तर मी करायचोच; पण आता मुरलीतही रस यायला लागला.

त्या दिवसांत आम्हा कुमारांचे खूप छान संघटन होते. आम्ही सर्वजण एकत्र मुरली ऐकायचो, चर्चा करायचो, खूप मस्त मित्र–परिवाराचा ग्रुप तयार झाला होता. मलाही त्यांच्या संपर्कात छान वाटायचे. शाळा कॉलेजात लौकिकता असल्याने असभ्य अश्लिल बोलणे, वागणे, मुलींबद्दलचे वाईट विषय, ते खूपच त्रासदायक वाटायचे. परंतु सेंटरच्या ग्रुपमध्ये सुरुवातीला मला महत्त्व कळले आणि मी नियमित विद्यार्थी झालो.

माझ्या आईने मला लहानपणीच ७/८वी तच कराटे

क्लास लावला होता. कणखर व्हावं आणि स्वतःच्या बचावासाठी. लोक मला वेगळ्या नजरेने बघायचे, चिडवायचे त्याचा मला खूप राग यायचा आणि मग लगेचच मारामारी सुरू करायचो.

कॉलेजातही वर्गात प्रोफेसर असले तरी कुणी काही बोलले की मी त्या मुलांना लाथा-बुक्क्यांचा प्रसाद द्यायचो. इतका राग यायचा. मग मुलंही हळूहळू मला घाबरायला लागली. पण बाबांच्या ज्ञानामुळे हळूहळू ह्यात परिवर्तन व्हायला लागले. राग, द्वेष, चिडचिड होणं थांबलं आणि सर्वांबद्दल मनातून शुभभावना प्रकट होऊ लागल्या आणि खूपच हलकं वाटायला लागलं.

माझ्या मित्र परिवाराला हे परिवर्तन उघड दिसायला लागल्याने तेही विचारू लागले की, कशामुळे तू एवढा शांत झालास? आत्मविश्वास वाढून शांतीचा अनुभव व्हायला, परिणाम दिसायला लागले. मी ठरवलं आपण राजयोगाचा अभ्यास आपल्या शिक्षणासाठी करायचा. मुरली, स्वमान यांचा अभ्यास वाढला. बाबा जेव्हा म्हणायचे की मी तुम्हाला विश्वाचा मालक बनवायला आलोय, तेव्हा तर काय नशा चढायचा ! अगदी १६ वर्षाचा असेन मी तेव्हा. मला वाटायचे अशी कोणतीही गोष्ट मला अशक्य नाही, कारण माझ्याबरोबर बाबा आहेत याचमुळे मला जेव्हा सांगण्यात आलं, की तू सी.ए. करू नकोस जमणार नाही. पण मी म्हटलं आता तर मी सी.ए. करणारच. मी सी.ए. चा फॉर्म भरला. पालकाना म्हटलं तुम्ही टेन्शन घेऊ नका. आत्तापर्यंत तुम्ही मला शिकवलं. पण आता माझा अभ्यास मीच सांभाळेन.

आईला तर आश्चर्यच वाटलं कारण शाळेत फळ्यावरचे दिसत नसल्याने आई ते ऑडिओ कॅसेट वर रेकॉर्ड करायची आणि घरी अभ्यास घ्यायची. ११वी ला गेल्यावर मी ट्युशन क्लास मध्ये जाऊन अभ्यास करायचो. बाबांच्या मदतीमुळे बुद्धी खूप शुद्ध झाली. त्यामुळे ऐकलेलं लगेच लक्षात राहायचं.

सीएची परीक्षा चालू असताना आईने म्हटले १-२ आठवडे तरी मुरली नाही वाचलीस तर चालेल. मी निर्धाराने मुरली नियमित वाचत राहिलो. भले मुरलीची प्रत घरी आण पण मला मुरली हवीच. अशाप्रकारे मुरली न चुकवल्याने मला परीक्षेचे दडपण कधीच आले नाही. परीक्षेच्या वेळी माझ्या छोट्या भावाचा अपघात झाला आणि दुभाजकाचे टोक घुसल्याने यकृताला इजा झाली. ते खूप अवघड ऑपरेशन होते. जीवन मृत्यूची लढाई होती. मला हॉस्पिटलला सतत जावे लागले. बाबांमुळे तो वाचला (असा माझा ठाम विश्वास) आणि १ -२ आठवड्यात बराही झाला. ह्या गोष्टीमुळे पालकांना वाटले, की सीएची परीक्षा बुडणार. कारण हॉस्पिटलमध्ये जाण्या-येण्यात बराच वेळ जायचा. त्यात अभ्यास नियमित नाही, सेंटर, सेवा, मुरली वाचणे - ते म्हणायचे काळजी करू नकोस. नापास झालास तरी ६ महिन्यांनी परत परीक्षा दे. मी म्हणायचो घाबरू नका ही कठीण परीक्षा मी नक्की उत्तीर्ण होणार कारण माझे पेपर्स छानच गेलेत.

सीएच्या अभ्यासाबोबरच मी संगीत साधनाही सुरू केली. ७/८ वीत पियानो शिकलो होतो. पर्यायी योजना, उद्या मी काही नाही करू शकलो, तर निदान उदर निर्वाहासाठी ही कला असावी.

संगीत साधनेसाठी मी - ट्रिनिटी कॉलेज, लंडन या संस्थेच्या पुण्यातील शाखेत प्रवेश घेतला. बाबांचा पुत्र असल्याने उत्साह खूप वाढला होता. त्यामुळे पियानो गिटार, माऊथ ऑर्गन, व्होयलिन. बॅन्जो, हार्मोनिअम, सतार, बासरी अशी जवळ जवळ २८ वाद्ये शिकलो. आजही माझ्या घरी ही वाद्ये आहेत.

मग मी सभेत संचार करण्यासाठी कॉलेज स्पर्धांतून भाग घेऊ लागलो. सेंटरवरही छोट्या मोठ्या कार्यक्रमात भाग घ्यायचो. त्याने आत्मविश्वास वाढायला लागला. हळूहळू ईश्वरी सेवेतही रुची वाढायला लागली. सुरुवात बुधवारच्या साफसफाईने केली. मी कुणाला विचारायचो सेवा करू का? तर म्हणायचे आम्ही करतो. मलाही वाटायचं बाबांच्या घरी सेवा करून भाग्य जमा करावे. मग मी स्वतःच सुरुवात केली. खिडकी पुसत असेल कुणी, तर बघून बघून मीही करायला लागलो.

मी म्हणायचो मला शिकू द्या, अनुभव घेऊ द्या. सेंटर वर पांढऱ्या बोर्डवर मुरलीचे महावाक्य कुणी भाऊ लिहायचा, मग मी स्वतःहूनच तो बोर्ड पुसून करून ठेवायला लागलो. एकदा ते भाई म्हणाले, ''मला उशीर होतोय. तू बोर्ड लिहिशील का? नाही म्हणणार होतो; पण बाबांचे महावाक्य आठवले की, कोणत्याही गोष्टीत हाँजी चा पाठ असावा. त्याने बाबांची खूप मदत आणि बळ मिळते.'' अक्षर चांगले नसतानाही मी आत्मविश्वासपूर्वक लिहिल्याने

त्यांनाही ते खूप आवडले. सांगायचं तात्पर्य, आपण हाँजी च्या पक्क्या धड्याने सेवेतील योगदानाने बाबा आपसूकच खूप सेवा देतात. लहान-सहान सेवा करत असतानाच एकदा मेळा होता. शिवरात्रीचा देखावा आणि रस्त्यावरून प्रभात फेरी असायची. त्यासाठी ध्वनिमुद्रण करायचे होते. ध्वनिमुद्रणाचा कुणालाच अनुभव नव्हता. दीदींनी विचारताच मी म्हटले प्रयत्न करतो. लहानपणी आई माझ्यासाठी अभ्यास रेकॉर्ड करायची. त्यामुळे घरी टेप रेकॉर्डर होता. मग त्यावरच ही सेवा सुरू झाली.

ह्या सेवेबरोबरच मग दुसऱ्या सेवेचे प्रकल्प सुरू झाले. त्यावेळी आमच्याकडे संगणकही होते. त्यावर ध्वनिमुद्रण सुरू केले. त्यासाठी मी काही सॉफ्टवेअर ही शिकलो. पुढे IT क्षेत्रात खूप वेगवेगळी सॉफ्टवेअर शिकलो. त्यामुळे ध्वनिमुद्रणही अगदी छान व्हायला लागले. आणि मग स्वत:च संगीत तयार करणे, CD बनविणे, पार्श्वसंगीत देणे, बाबांची गाणी, उद्घोषणा अशी सेवा मिळू लागली.

पुण्यात मराठी भाषक जास्त असल्याने मग गणपती, नवरात्री, शिवरात्रीच्या घोषणांचे ध्वनिमुद्रण धडाक्यात सुरू झाल्याने माझी सेंटरवरची सेवा जोरात सुरू झाली. तरुणांसाठीची ही सेवा जसे कॉलेजेसमध्ये जाऊन सर्वांना स्वानुभव ऐकवणे, सकारात्मकतेवर बोलणे अशा सेवा सुरू झाल्या. त्यावेळी बी. कॉम करण्याबरोबरच सी.ए. करत होतो. त्यातच ईश्वरी सेवा आणि संगीत साधनेही शिकायचे. लंडन म्युझिक कॉलेजच्या परीक्षा फार कठीण असतात. त्यात म्युझिक नोटेशन्स असतात. त्यात गाण्याच्या शब्दांची भाषा गोल गोल अशी वेगळीच असते. ती बघून वाजवायचे असते आणि मला तर काहीच दिसायचे नाही. पण बाबांची मदत म्हणा हवं तर, मला एक टेलिस्कोप मिळाला. मग मी काय केले, की माझ्या चष्म्याला एक भोके करून त्यावर टेलिस्कोप लावला. याने मला १ फूट दूरचे छान दिसू लागले. कारण पियानो वाजवताना तुमचे नोटेशनचे कागद १-२ फूट अंतरावर ठेवतात. ते बघून वाजवायचे असतात.

माझे नोटेशन पाठ असले, तरी परीक्षेच्या वेळी वेगळे नोटेशन देतात. अशा वेळी ही टेलिस्कोपची युक्ती काम करून गेली. गम्मत म्हणजे हा टेलिस्कोप कुणी कुठून आणून दिला. आजपर्यंत मला कळले नाही. मग मला हे ही कळले की डोळ्यांवर टेलिस्कोप लावून बघणे जरा अवघड असले, तरी मला हे साध्य होते! मला आता ह्या ट्रीनिटी म्युजिक कॉलेज, लंडनच्या परीक्षेत छानच मार्क्स मिळू लागले. खूप छान आयुष्य चालले होते बाबांमुळे. अशातच सीए ची परीक्षा होती, पण त्याच्या अभ्यासाला काही हवा तसा वेळ देता यायचा नाही. तेव्हा मी नोकरीही करायचो. सीए करताना उमेदवारीसाठी सीएकडे काम करायला लागायचे. दिवसभर ऑफीस, सकाळ संध्याकाळ शिकवण्या हे सर्व करतानाही बाबांशी खूपच लगन असल्याने सेंटरवर जाऊन कसंही करून मुरली हमखास ऐकायचीच असं मी ठरवलंच होतं.

त्यावेळचं माझं सीए फायनलच्या आधीच वेळापत्रक बघा हं - सकाळी ६.०० ला घरून निघून ७-९ कोचिंग क्लास, तिथून थेट ऑफीस, १०-६ अशी ८ तास ड्युटी. संध्याकाळी पुन्हा दुसरा क्लास ६.३० ते ८.०० लगेच पळत पळत समोरच बस स्टॉप वर जायचो. दूरचे काहीच दिसत नसल्याने माझी बस आली की सांगा बरं असं आजूबाजूला सांगायचो. लोकं ही मदत करायचे. घरी जाईपर्यंत ८.२५ व्हायचे. तोपर्यंत मुरली क्लासची वेळ उलटून जायची. ८.३० ला सेंटरवर पोहोचायचो. असंच २-३ वर्ष चाललं. बाबांच्या रूम मध्ये १० मिनिटं बसून त्यांना दिवसभराच्या घडामोडी सांगायचो. मग बाबा एकदम हलके करून टाकायचे. ९ला सेंटर बंद होत असल्याने थोडी फार महावाक्य वाचायचो. त्यावेळी आजच्यासारख्या सोयी नव्हत्या. युट्युब, मोबाईलवरची मुरली वगैरे नव्हते. ९ला घरी जायचो. पण सेंटरची ती २०-२५ मिनिटे इतकी शक्तिशाली असायची की दिवसभराचा सारा शीण निघून जायचा. बाबांच्या महावाक्याने मी प्रफुल्लित होत असे. जेवून झोपलो की दुसऱ्या दिवशी पुन्हा अमृतवेळेपासून दिनक्रम सुरू.

तर सांगायचं तात्पर्य असं की, जर आपली ओढ असेल, मुरली, बाबा, सेंटर विषयी, तर आपल्याला कुणीही थांबवू शकत नाही. १०-१५ मिनिटेसुद्धा बाबा अनुभूती करवतातच.

(क्रमशः)

***



# प्रभु प्रेमिका : दादी ऑलराऊण्डरजी !

ब्र. कु. हेमंत, शांतिवन

श्रीकृष्णाच्या मुरलीवर भाळणाऱ्या गोपी, कान्हाच्या बासुरीचे मंजुळ स्वर कानी पडताच, एका नेत्रात काजळ तर दुसऱ्यात नाही, एका पायात चप्पल पण दुसरा पाय अनवाणी-अशा बावऱ्या अवस्थेत मुरलीची मधुर तान ऐकायला धावत. भागवतमधील गोपिके सारख्याच, जगाच्या लोकलाजेची पर्वा न करता, शिवबाबांची ज्ञान-मुरली ऐकण्यासाठी अनवाणी पायाने धावत जाणाऱ्या, गोपीवल्लभ परमात्म्याची एक सच्ची गोपी होती, 'राजयोगिनी दादी ऑलराऊण्डरजी !' भक्त मीराने 'मेरो तो एक गिरधर गोपाल, दूसरों न कोई' हा ध्यास धरून कृष्ण-प्रेमात विष प्राशन केलं, असंच मनी-ध्यानी 'माझा तर एक ईश्वर' हा दृढ निश्चय करून सासरचा अत्याचार सहन करत, अनेक अग्निपरीक्षा देत, दादींनी विरोधाचं विष प्राशन केलं. लौकिक बंधनं तोडून यज्ञात सर्वस्व अर्पण करणाऱ्या दादीजी मुरलीधरच्या मस्तानी गोपिका व खऱ्या प्रभू प्रेमिका होत्या.

दादीजींचा दैहिक जन्म कराचीत झाला. लौकिक पिता 'बादुराम' यांनी 'हासाराम' यांच्याशी विवाह लावून दिल्यावर दादींना सासरी नाव मिळालं 'रुक्मिणी' तर शिवपित्याने अव्यक्त नाव प्रदान केलं, 'धीर्यपुष्पा!' विविध क्षेत्रांत अनुभवी व कार्यकुशल दादी कोणतेही काम करण्यात तरबेज होत्या, म्हणून ब्रह्माबाबा प्रेमाने 'आलराऊण्डर' म्हणत. निरहंकारी दादीजी प्रत्येक सेवा, मग ती छोटी असो वा मोठी, मोठ्या प्रेमाने करत. हरहुन्नरी दादींनी यज्ञात १७ प्रकारच्या सेवा सांभाळल्या. बाबांनी दादींना खरेदीसाठी नियुक्त केलं होतं. दादी लौकिक नात्याने गुलजार दादींच्या मातोश्री होत्या. दादींचा प्रिय शब्द होता, 'लाल!' ब्रह्मावत्सांना त्या 'लाल-लाल' म्हणून संबोधत. दिल्ली पाण्डव भवन येथे दिल्ली झोनच्या संचालिका बनून अखेरच्या श्वासापर्यंत दादींनी सेवा केली.

दादीजी स्वतःच्या संघर्षाची कथा अशी वर्णन करतात, 'माझी एक मामी होती 'गंगा देवी!' त्यांना काश्मीरहून बाबांचे लाल अक्षरात पत्रं येई, ते ऐकून सन्नाटा होई, मनात उजेड पडू लागे. प्रभु-प्रियतमाची पत्रं ऐकायच्या ओढीने मी मामींकडे पुन्हा-पुन्हा जाई. एकदा बाबांना महापुरुष मानून मामीने निमंत्रण दिलं. बाबा, ओमराधे, ध्यानी दादी व ३० लोक बस भरून आले. मीही सत्संगात गेले. तिथे बाबांच्या भृकुटीमधे चमकत्या धवल प्रकाशाच्या गोळ्याकडे एकटक पाहत राहिले व बाबांना गुरु करण्याचा मनोमनी दृढ निश्चय केला. दुसऱ्या दिवशी बाबांच्या आज्ञेनुसार ध्यानी दादींनी 'तीन लोकांच्या' चित्राद्वारे ज्ञान दिलं. बाबा रोज सत्संग करत, बाबांच्या मस्तकी चमकणाऱ्या प्रकाश वलयास पाहतच रहावेसे वाटे. बाबा वदत, 'जे ब्रह्मचर्य पाळतील-तेच देवलोकी जातील' त्याकाळात माझे पतीही येऊ लागले व ज्ञान घेता-घेता त्यांचेही बाबांशी आत्मिक नाते जुडले. मग मी व पतीने पवित्र जीवनाची प्रतिज्ञा केली.

हैद्राबादला बाबांनी बालभवनात ओममण्डळीत येणाऱ्या जिज्ञासूंच्या मुलांसाठी वसतिगृह काढलं. त्यात माझी नऊ वर्षीय पुत्री शोभाला (दादी गुलजार) दाखल केलं. ओममण्डळी विरोधकांनी पिकेटींग करुन उपद्रव केल्याने मुलांना घरी पाठवलं. त्यात शोभाही परत आली, पण अलौकिक दुनियेतून ती लौकिक दुनियेत आल्यासारखं वाटत होतं. तिथलं शिक्षण व वातावरण आणि घरातील वावर यात मोठं अंतर होतं. हे पाहून वाटे ईश्वरार्थ सेवेत दान दिलेल्या वस्तुस (पुत्री शोभा) माघारी घेणे योग्य नव्हे. आम्हां पती-पत्नी मधे वैचारिक मतभेद होत गेले. एकीकडे मी एकटी व दुसरीकडे पती व सासर होतं. त्यामुळे वैराग्य आलं व मनांत एकच टाहो फुटे, 'हे प्रभु, हे जीवन कधी तुझ्या स्वाधीन करीन ? '

यानंतर सिंध हैद्राबादमधे सामाजिक उद्रेक झाले व

बाबा कराचीला आले. सत्संग घरापासून दहा मैल दूर होता. तिथे जायला सकाळी घोडागाडी व ट्राम होती. ट्राममधील मजुरांची दृष्टी-वृत्ती खराब असे, तरीही मी निर्भयतेने सत्संग करून ८ वाजता परत येई. पती कधी साथ देई, कधी नाही. लौकिक नातेवाईक शोभाला मायावी जगात खेचायचा प्रयत्न करत. विकारी संगाचा रंग मुलीवर चढू नये म्हणून तिला वाचवावेसे वाटे. पण मी मुलीला बिघडवत आहे ह्या गैरसमजूतीने नातेवाईकांनी माझं येणं-जाणं बंद केलं. मी कधी ड्रायव्हरच्या मदतीने, तर कधी युक्तीने २-३ दिवसात सत्संगात जाई. पण हे कुठपर्यंत लपणार! माहीत झाल्यावर कुटुंबीय धमक्या देत, भीती घालत. मी कोपऱ्यात बसून शिवबाबाची आठवण करायचे व कानात स्वर पडायचे, 'क्यो अधीर हो माता, गुरुकुल में मैं आ बसा हूँ, संताप सख्त भारी अबला पर देख रहा हूँ' तेव्हा अनुभव होई कि बाबा माझ्यात शक्ती भरत आहेत. अखेर मी स्वार्थी व विकारी जगाचा त्याग करायचा संकल्प केला आणि सकाळी ४ वाजता शोभाला घेऊन कराचीला सत्संगात पोहचले. बाबांनी विचारलं, ''बेटा, कशी आलीस?'' मी उत्तरले, ''बाबा, विकारी विश्वाचे बांध तोडून आले.'' बाबा म्हणाले, ''इतक्या धांदलीत कशी राहशील?'' मी म्हणाले, ''मी सद्गुरुच्या दारी पाऊल ठेवलं, मागे कसं घेऊ?'' तेव्हा करुणाघन बाबा म्हणाले, ''मुलीवर अत्याचार होतात, म्हणून शिवणाच्या क्लासमध्ये तुमच्या राहण्याची व्यवस्था करूया.''

मनात भीती होती की कुणी खेचून तर नाही नेणार? अन् खरंच, संध्याकाळी ६ वाजता दीर व दोन मामांसोबत पती येऊन म्हणाले, 'रुक्मिणीला भेटायचं'. बाबांनी परवानगी दिली. पती आत येऊन म्हणाला, ''इथे का आलीस?'' मी म्हणाले, ''ज्ञाना (मुरली) शिवाय जगू शकत नाही, इथेच राहीन व शिवणकाम करून दोघींचं पोट भरेन'' हे ऐकून त्याने रागाने डोळे लाल केले व चौघांनी हात-पाय पकडून, मला खेचत टॅक्सीत डांबले.'' मी म्हणाले, ''जीवघात करेन; पण परत येणार नाही.'' पती घाबरुन म्हणाला, ''वेगळं का राहतेस?'' पाच मैल दूर मित्राच्या फ्लॅट मधे नेऊन पती म्हणाला, ''तुला वेगळं ठेवतो; पण जीवघात करू नकोस.'' मी चार अटी ठेवल्या १) अपवित्र करण्यास दबाव टाकणाऱ्यापासून वेगळी राहीन २) दिवसातून एकदा सत्संग अवश्य करेन, ३) शोभाला घरी पाठवणार नाही, ४) सर्व नियम (ब्रह्मचर्य-शुद्ध अन्न) पाळीन. दीर व दोघं मामा निघून गेल्यावर, मी ओढणीने गळा घोटू लागले तेव्हा पती म्हणाला ''आत्महत्या का करतेस?'' मी ठामपणे म्हणाले, ''मी सत्संग, ईश्वरी नियम त्यागू शकत नाही, ना शोभाला आणू शकत. अटी मान्य करा नाही तर देह त्यागते''. पहाटेचे ४ वाजले होते. काही बरं-वाईट होऊ नये म्हणून पतीने अटी मान्य करून लिहून दिलं. हा पतीमधे रुजलेल्या अविनाशी ज्ञान-बीजाचाच प्रभाव होता. अमृतवेळी पती सत्संगात घेऊन गेले, सर्वांना आश्चर्य वाटलं. शोभाही सोबत राहू लागली. अडीच महिने सर्व सुरळीत चाललं होतं.

बंगल्याचे ३०० रु. भाडं द्यावं लागतं-हे सांगून मला घरी नेलं व संत्सगात जायला बंदी घातली. नातेवाईक पतीचे कान भरू लागले. कुटुंबात सर्वात लहान असल्याने पती, भावांपुढे विवश होई. एकदा मी लपत-छपत सत्संगात पोहचले, हे माहीत झाल्यावर नातेवाईकांनी पूर्ण घराला कुलुपं लावली. मी म्हणाले, 'जेलमधे ठेवून आत्म्याचे भोजन बंद करता, तर मी देहाचे भोजन बंद करते. शरीर सुटलं तर प्रभूपाशी जाईन.' नातेवाईकांनी सर्वांना सख्त नजर ठेवण्यास सांगून, पहारेकरी ठेवले. २-३ दिवस काहीही न खाल्याने अशक्त वाटू लागलं. त्यांना भीती होती की, माझं शरीर तर नाही सुटणार? त्यांनी अनेक मायावी आमिषं दाखवली. पण मी प्रभुवर फिदा झाले होते, रंगीत कपडे व स्वर्ण-आभूषण त्यजून मी श्वेत वस्त्र परिधान केली. त्यांना वाटे श्रीमंतीत वाढलेली गरिबीत कशी राहील? ही स्वतः ज्ञान सोडेल. पण मी रात्रंदिवस त्रास सहन करत होते व ईश्वर कृपेने साक्षात्कार होत होते. विष्णुरुपात येऊन बाबा वदत, 'मुली संयम ठेव, दुःखाची दुनिया गेल्यात जमा आहे. भवसागर पार करायलाच मी आलोय.' हे ऐकून धीर येई की, ह्या तुरुंगातही ईश्वर माझा रक्षक आहे. नातेवाईक निर्दयी होत गेले, माझी प्रभुप्रीती व ओढ आणखी तीव्र होत गेली.

मनात विचार आला, पर्वतावरुन फेकल्यावर प्रल्हादाला देवाने वाचवले, मग मी गॅलरीतून का उडी मारू नये? मन पक्कं करून कपडे, दागिने यांची यादी करून कपाटात ठेवले. रात्री १२ वाजता सर्व झोपेत होते. आवाज होऊ नये म्हणून रजई गुंडाळून खाली फेकली. पण खाली पाहिलं तर पहारेकरी फिरत होते, उडी मारणं उचित नव्हतं. बाजूच्या बंगल्याच्या गॅलरीत शेजारी झोपले होते, तिथे उडी

मारली. छोट्या मुलाला पाय लागला, तो रडू लागला, वाटलं त्याची आई बघेल, मी शिवबाबांना आठवत होते, त्यामुळे तिचं लक्ष गेलं नाही. सर्वांना ओलांडून अंधारात जिना शोधला. खाली उतरून दरवाजा उघडला. बाहेर पहारेकरी होता. रात्रीचे दीड वाजले होते. भिंतीवरुन उडी मारताना आवाज होऊ नये, म्हणून चप्पलही घातली नव्हती. पाऊस पडत होता. रस्त्यात शिपाई भेटला. वाटेत त्याला आणखी पोलीस मिळाले. सर्वांनी पाठलाग करून विचारलं, 'एकटी कुठे जाते?' मी म्हणाले, 'सत्संगात,' तेवढ्यात गाडीवाला आला, त्याला सत्संगात सोड म्हणाले, पण पोलीस म्हणाले, 'आता पोलिस ठाण्यात बस सकाळी जा'. मी देवाचा धावा केला, 'प्रभु, तूच रक्षण कर' व पोलिसांना म्हणाले, 'मला ४ वाजता सत्संगात जायचं होतं, आता २ वाजले तर आईपाशी जाते. आईकडे जाताना जागोजागी भेटलेले २५ पोलीस सोबत आले. मी आईच्या घरी पोहचले. शेजारी दोन विरोधी मामा रहात. चौकीदाराने २५ पोलीस व मला अनवाणी पाहून, न विचारता मामांना सूचना दिली. ते पोलीसांना म्हणाले, 'ही आमची मुलगी आहे, तुम्ही जा.' मामा क्रूरतेने म्हणाले, 'इतक्या रात्री येऊन आमची प्रतिष्ठा घालवली.' मी म्हणाली, 'घड्याळ बंद होतं, ४ वाजले समजून सत्संगात जात होते, वाटेत पोलीस भेटले,' हे ऐकून ते झोपी गेले ही देवाचीच कृपा होती. आईचे दार वाजवलं तेव्हा तिने आत घेतलं. मला कुलुपात बंद केलं-ही व्यथा ऐकून तिलाही वैराग्य आलं. ४ वाजता छोट्या बहीणी (रुक्मिणी दादीं) सोबत टांग्याने १४ मैल दूर कुंजभवनात पोहोचले.

मातेश्वरी व पिताश्रींना भेटून मी म्हणाले, ''आज आसुरी जीवन त्यागून ईश्वरी जीवन जगायचं मी पाऊल उचललं. विकारी जीवन समाप्तीची प्रतिज्ञा करते'' हे ऐकून बाबा हसले. मम्मा परीक्षा घेत म्हणाल्या, ''त्यासाठी मोठी हिम्मत हवी, विविधरूपात माया येईल. नातेवाईक येऊन जोर-जबरदस्ती करतील. त्यांच्या निर्दयतेचा सामना करशील?'' मी म्हणाले, ''त्यांना हवं ते धन-दागिने सोडून आलेय. मी प्रतिज्ञा करते की, प्रभु जे खाऊ घालेल, जसं ठेवेल तसं राहीन.' ईश्वरी जीवनाच्या प्रारंभाचा तो शुभदिन होता. मी तेथे नाही हे पाहून नातेवाईकांनी चौकीदाराला विचारलं. तो म्हणाला, 'माहीत नाही.' दार उघडं पाहून त्यांना वाटलं चोर आला असेल. काहीही चोरी न गेलेलं पाहून अंदाज काढला की मी गॅलरीतून उडी मारली असेल. त्यांनी मला ५ वर्ष ईश्वरी धारणेनुसार जगताना पाहिलं होतं म्हणून त्यांना वाटलं जसं वैराग्य आल्याने बुद्ध मध्यरात्रीत जंगलात निघून गेले, तसं मी दागिने त्यागले. नक्कीच मला काहीतरी उच्च गोष्ट गवसलीय.

मला शोधत-शोधत सायंकाळी पति कुंजभवनात येऊन म्हणाले, 'रुक्मिणीला भेटायचं' मम्मा म्हणाल्या, 'जरुर' मी शिवशक्ति बनून समोर गेली व स्पष्ट शब्दात बोलली, 'मी जुन्या जगातून मेली, माझा पिच्छा नका करू. तुम्हाला मायावी सुखे हवी असतील तर खुशाल विवाह करा.' ते म्हणाले, 'मला लग्न करायचं आहे तशी स्वीकृती तसं लिहून दे' मी म्हणाले, 'तुम्ही विकारी सुख भोगायला मुखत्यार आहात, मला आत्मिक सुख लुटू द्या.' पती आठवडाभर येऊन, कधी लोभ तर कधी मोहाच्या जाळ्यात फसवायचा प्रयत्न करत राहिले. मी म्हणाले, 'माझा तर एक ईश्वर होय' ज्या मामींनी ज्ञान दिलं होतं त्या म्हणाल्या, 'विचार करून पाऊल ठेव, आता उत्साहात आहेस, थोडे तारतम्य बाळग, खूप संकटे येतील' मी म्हणाले, 'सद्गुरुच्या दरबारी दाखल झाले, परत कशी फिरू? तुम्हीच शिकवलंय ना 'सतगुरु मिलने जाईये, साथ न लीजे कोई, आगे पाँव धरिये, पीछे पाँव न होई'. नाना मोहिनीरूप घेऊन माया वाट अडवत होती. शेवटी मीच पतीला लिहून दिलं, 'तुम्हाला हवं ते करा.' हीच ती होती, माझी, देहाच्या नात्यांतील ममता नष्ट व्हायची अंतिम वेळ!फ

दिल्ली पाण्डव भवनच्या पुष्पा दीदी, दादींच्या प्रेमळ संगोपनाचे असं वर्णन करतात, 'दादीचं व्यक्तिमत्व मोठं आकर्षक होतं. दादी म्हणजे एक चैतन्याने सळसळणारं व्यक्तिमत्त्व होतं व त्यांच्या चालण्यात एक डौल होता त्यामुळे एखादा महाराजाच चालला आहे असं वाटे. दादींमधे जगन्मातेचे स्वरुपही होतं. मोठ-मोठे लोक भेटून, त्यांचे मातृवत संगोपन घेऊन संतुष्ट होतं. त्या ज्ञानाच्या सखोलतेत जात व अधिकारवाणीने ज्ञान देत, तेव्हा त्यांचं आत्मिक शिक्षकाचं रूप दिसे. स्वतः धान्य निवडत, निवडलेल्या भाजीतून पाने गोळा करत व स्वतः कर्म करून शिकवत. दादींचे प्रशासन शिस्तीचे होतं. शाळा-कॉलेजच्या प्राचार्या सारखं शिस्तीत ठेवत. विशाल सेवेचा तर त्यांना खूप शौक होता. अजमल खां पार्कमधे मेळा होता, तेव्हा म्हणाल्या, 'मेळा सुंदर झाला पाहिजे.' दादी साधेपणाच्या मूर्ती होत्या.

फोटो काढायला कॅमेरा आणला तर म्हणत, 'ही सुद्धा माया आहे.' स्नानघर बाहेर होतं, कुणी म्हणालं 'जोडून बाथरुम बनवा' तर म्हणत मोठ्या दादींची आज्ञा घेऊन बनवीन. प्रकाशमणी दादी दिल्लीत आल्या, त्यांना विचारुनच बाथरुम बनवलं. मोठ्या दादींना खूप सन्मान देत, त्यांना प्रत्येक गोष्ट विचारत, सेवा समाचार देत व संबंध जपत. मोसमाचं पहिलं फळ यज्ञात पाठवून नंतरच स्वतः खात. भोगासाठी प्राप्त पैशातून बचत करून मधुबनला पाठवत.

दादी खूप साहसी व धीराच्या होत्या. त्या प्रत्येक कामात प्रवीण व शक्तिशाली आहेत-ही जाणिव होई. यज्ञातून दादी सेवार्थ बाहेर गेल्या, तेव्हा बाबा म्हणाले 'दादींच्या सेवा कोण करणार? तेव्हा २-३ भावांनी हात वर केला व बाबांनी त्यांना सेवा वाटल्या-त्या सर्व सेवा दादी एकट्याच करत. भाजीपाला-धान्य खरेदी करणं, सेवेसाठी नवं स्थान शोधणं, भोजन व टोली (प्रसाद) बनवणं, धान्य निवडणं, भाजी कापणं, जेवण वाढणं ह्या सर्व जबाबदाऱ्या दादीच सांभाळत. स्वतःच्या मुली प्रमाणे प्रेम देऊन दादींनी माझे भरणपोषण केले. एकदा जेवण वाढणारी बहीण मला दही द्यायला विसरली- हे पाहून स्वतः दही न खाता, त्यांची दह्याची वाटी मला दिली, हे एका बहिणीने सांगितल्यावर मला गहिवरुन आलं. कुमारींना माहेरीही मिळणार नाही इतके छान संगोपन देऊन संतुष्ट ठेवत. कन्यांच्या क्षमतेनुसारच त्याग करायची प्रेरणा देत. स्वतः उशीखाली दाबलेले कपडे नेसत. मला उशीखाली ठेवलेले कपडे पसंत नसत, म्हणून युक्तिने माझ्याकडून कपड्याचे गाठोडं घेत व गुप्तपणे कपडे प्रेस करायला पाठवत. न्याहारीत विशेष काही असलं तर सर्वांना समान मिळावं म्हणून प्रेमाने स्वतः वाढत, तेव्हा त्यांच्यात मातेची ममता व वात्सल्य दिसे.

दादी खूप नष्टोमोहा होत्या. दादी व लौकिक सुपुत्री दादी गुलजार दोघी सोबत रहात, पण भासत नसे की दोघी मायलेकी आहेत. लौकिक बद्दल विचारलं तर म्हणत, 'बाबाने देहाच्या दुनियेतून मुक्त केलं, ते जुनं जग आठवणं जणू थुंकलेलं परत चाटणं होय.' बाबांचे चरित्र मात्र खूप आवडीनं वर्णन करत. दादी सिंधी बोलत नसत, गुलजार दादीशींही हिंदीतच बोलत. त्या म्हणत सिंधीत बोलणं म्हणजे पुन्हा लौकिक आठवणं. दीदी मनमोहिनी म्हणत, ''ऑलराऊण्डर दादी सिंधी बोलत नसल्याने हिंदीत छान भाषण करते.'' दादी वक्तृत्वकलेत प्रवीण होत्या. बाबांनी वर्ज्य केलेली बाब कधीच करत नसत. पाण्डव भवनमधे संघटन मोठं होतं. कुणी असंतुष्ट होऊन काही बोललं, तर त्या चूप राहत, म्हणत, 'बोलत-बोलत भरे विकार (बडबड केल्याने विकार भरतात)'. कुणी ऐकलं नाही तर, शक्तिशाली स्थितीत स्थित होत. निर्भय दादी, न व्यक्तीला भीत, न परिस्थितीला! लौकिक मातेचा माझ्यात मोह होता. एकदा मला ताप आला. आईचा फोन आला पण त्यांनी-मी आजारी आहे हे ना आईला कळवलं, ना मला फोनबद्दल बोलल्या व मला नष्टोमोहा बनवलं.

दादींचे विद्यार्थी जीवन आदर्श होते, त्या वरांड्यात बसून मुरली, ज्ञानामृत पत्रिका वाचत. सकाळी गुलजार दादी क्लास करत, नंतर दादी सर्वांना भेटत व गुरुवारी-रविवारी क्लास करत. सेवेत आम्ही कन्या असून थकत होतो; पण वृद्धावस्थेत देखील दादी रिकामं न बसता, काही ना काही करत. त्यांना सुस्ती पसंत नसे व सुस्तावून झोपलेलं आवडत नसे. तब्बेत बरी नसल्यास प्रेमाने विचारपूस करत, औषध व आरामाचा प्रबंध करत. पण बरं झाल्यावर म्हणत, 'आता सेवा करा.' मी नवीन होते म्हणून कोर्स करण्यात मार्गदर्शन देत. कोर्सच्या आधी जिज्ञासूला ५ मिनिटे भेटत, त्यांची गरज पारखत व सांगत, 'लाल, ह्यास विशेष शांतीवर सांग, ह्याला आत्म्याबाबत विशेष सांग.' आम्ही अर्ध्या तासात पाठ पूर्ण करायचो, पण म्युझियम पाहणाऱ्या व कोर्स करणाऱ्या एक-एक जिज्ञासूसोबत बसून दादी प्रश्नांची सविस्तर उत्तरं देत.

जगदीश भाईंच्या मनात दादींबद्दल खूप श्रद्धा होती, दादींच्या त्यागाचा मोठा प्रभाव होता. दादींनी गुलजार दादींसारखे अनमोल रत्न यज्ञास दिले व दिवस-रात्र अथक सेवा केली म्हणून जगदीश भाई दादींचा खूप आदर-सन्मान करत. दादींना पाहताच उठून उभे होत, नम्रतेने हात जोडून ओमशांती करत. १९९३ साली मधुबन मधे राजे मंडळींचं सम्मेलन होतं. ते पहायची दादींची इच्छा होती; पण आजारी होत्या. जगदीश भाईंनी स्वतःसोबत विमानानं दादींना मधुबनला नेण्याचं साहस केलं. दादींनी कार्यक्रम पाहिला. त्या एक महिना मधुबनला राहिल्या. अस्वस्थ असूनही अव्यक्त बापदादांना भेटल्या व वयाच्या ८९ वर्षी, २३ नोव्हेंबर १९९३ रोजी देह त्यागून, शिवपित्याच्या कुशीत सामावल्या.

***



चिंतन

# चित्तक्षोभ

ब्र. कु. साहेबराव, पाबळ

आजकालच्या मॅनेजमेंट स्टडीजमध्ये एक गोष्ट शिकवतात 'मॅन मॅनेजमेंट'! म्हणजेच आपल्यासोबत काम करणाऱ्यांसोबत आपले खटके उडू नयेत ही अपेक्षा असते. कुठल्याही पदावरच्या माणसाचे इतरांशी मतभेद होतात तेव्हा सूक्ष्म पातळीवर रक्तदाब वाढतो. श्वासाची गती वाढते. कार्यालयीन वातावरण तात्पुरते का होईना ढवळून निघते. एखाद्याचा स्वभाव, कटु प्रसंग मनात धरून ठेवण्याचा असेल, तर अढी निर्माण होते. असे अनेक प्रकारे नुकसान होते. एखाद्या मतभेदाच्या प्रसंगी जो माणूस रागावतो, विचलित होतो, तो इतरांना जबाबदार धरतो. अमुक व्यक्ती असं वागली किंवा बोलली म्हणून मी असं बोललो. खरंतर ही मल्लीनाथी असते. हे सगळं समजावून सांगण्याकरिता एक उदाहरण दिलं जातं 'कॉफी का सांडली?'

एखादा काल्पनिक प्रसंग डोळ्यासमोर आणा आणि पहा. टेबलवर कॉफीचा कप ठेवला आहे आणि काहीतरी कारणाने धक्का लागून कॉफी सांडते. कुणी वेंधळेपणा केला कुणाची जबाबदारी वगैरे प्रश्न गौण ठरवायचे आणि मग विचार करायचा की कॉफी का सांडली? त्यांच उत्तर येतं कारण कपात कॉफी होती म्हणून. जर कपात चहा असता, दूध असतं तर ते सांडलं असतं. अगदी नेमकं हेच आपल्या बाबतीत घडतं. आपण का चिडतो? कारण आपल्या मनात क्रोध किंवा क्षोभ करण्याची प्रबळ सवय दडलेली आहे म्हणून. जे आत आहे तेच बाहेर येतं हा सोपा नियम आहे.

आपल्या आत, मनाच्या गाभ्यात शांतता नांदत असेल तर तीच अशा प्रसंगी बाहेर येईल. शांतता बाहेरच्या जगतातून मिळवता येते; पण ती तात्कालिक असते. रोजच्या कामाच्या व्यापातून आपण चार दिवस एखाद्या शांत ठिकाणी गेलो की शांततेचा अनुभव मिळतो; पण पुन्हा 'ये रे माझ्या मागल्या' हा अनुभव येतो. श्वसनाचे काही प्रकार जसे, अनुलोम-विलोम किंवा कपालभाती नियमित करण्याने मनःशांती मिळते; पण कधीतरी प्रसंग आल्यावर ती शांतता ढळते देखील. यावर उपाय म्हणून श्वसनाच्या अभ्यासासोबत काही विचारांच्या आधारे अभ्यास करून पहा.

शेक्सपियरच्या 'अॅज् यू लाइक इट्' मधील जेक्स म्हणतो तसे समजून बघा. हे सगळं जग म्हणजे एक नाटक आहे. या विश्वव्यापी नाटकांत प्रत्येकाला एक सुनिश्चित भूमिका मिळाली आहे. जो तो आपापली भूमिका कसोशीने प्रयत्न करून बजावत आहे. प्रत्येकजण अभिनेता, अभिनेत्री म्हटल्यावर त्यात कुणाची भुमिका आपल्याला खलनायकी वाटू शकते. पण सखोल विचार केला तर ती व्यक्ती आपली भूमिका सादर करीत आहे. एकदा हे स्वीकारले की अनेक क्षोभतरंग शांत होण्यास मदत मिळते.

या नाटकांत कुणाचाच दोष नाही. 'पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा' या ओळीप्रमाणे प्रत्येकजण आपल्या स्वभावदोषांच्या अधीन आहे. जेव्हा असा भाव आपण धारण करतो तेव्हा दुसऱ्यांबद्दल स्वाभाविक जिव्हाळा वाटतो.

अशा विचारांची उजळणी करून पहा. या विचारांच्या सागरात रोज काही काळ बुडी घेऊन पहा. एक प्रयोग म्हणून करून बघा आणि ठरवा 'चित्तक्षोभ' कमी करता येतोय का?

***

**सुविचार**

धीरामुळे आनंद आणि शांती प्राप्त होते, तर अधीरता दुःखाकडे नेते. - अज्ञात



# माझे मनोगत

ब्र. कु. मोहिनी, न्युयॉर्क

**ब्र. कु. राजयोगिनी मोहिनीदीदी अगदी बालयात, ज्ञानमार्गाकडे आकृष्ट झाल्या. ब्रह्माबाबांना न पाहता एका अनामिक ओढीने या मार्गाकडे त्या वळल्या तेव्हा त्यांचे वय अध्यात्म कळण्याचे नव्हते; पण आपल्याकडे येणाऱ्या ब्र.कु. बहिर्णींकडे काहीतरी अलौकिकत्व आहे याची खूण अंतरी पटली होती. यथावकाश त्यांनी शिक्षण पूर्ण करून ईश्वरी कार्यात आपले जीवन वाहिले. ब्रह्माबाबांनी त्यांना सेवार्थ अनेक कार्यात समाविष्ट केले. १९७४ पासून त्यांनी परदेशातील कार्यात मोठा सहभाग दिला. कॅरिबिअन बेटांपैकी 'ग्याना' येथे १९७६ मध्ये सेवा केली. तत्पश्चात १९७८ मध्ये न्यूयॉर्क येथे गेल्या व तेव्हापासून अमेरिका व अमेरिका खंडातील देशांतील सेवेची धुरा त्या वाहत आहेत. इशु दादींच्या निर्वाणानंतर त्या अतिरिक्त प्रमुख प्रशासिका म्हणून कार्यभार सांभाळत आहेत.**

१९४७ मध्ये भारत-पाकिस्तान फाळणी झाली व नंतर आम्ही कराची मधून दिल्लीला आलो. आमचा लौकीक परिवार खूप मोठा होता. बाबांकडे माझ्या आजोबांचा दिल्लीचा पत्ता असल्यामुळे आमच्याकडे ब्रह्माकुमारी बहिर्णींचे येणे-जाणे चालू असायचे. त्यांच्याकडे बघून मला त्यांच्या विषयी आपुलकी निर्माण झाली होती. त्या नेहमी बाबा, आमचा बाबा म्हणत असायच्या. माझ्या मनांत नेहमी यायचे हा बाबा कोण आहे? 'कोणत्या तरी डोंगरावर एक वृद्ध बाबा राहतात ते अतिशय भारदस्त आहेत, असे तेव्हा मला वाटायचे. मी तेव्हा ११-१२ वर्षांची असेन, माझ्याकडे चॉकलेट आणि बिस्किटांचा खाऊ होता. मी आणून तो त्या ब्रह्माकुमारी बहिर्णींकडे दिला. हे तुमच्या बांबाकरता घेऊन जा म्हणून सांगितले, त्यावर त्या म्हणाल्या, बाबा हे खात नाहीत. बाबा दुधाचा पेढा खातात.

आमच्या घरातल्या आई-बहिर्णींना ब्र.कु. बहिणी घरी आल्यावर ज्ञान शिकवायच्या, त्यामुळे नंतर आमच्या आजोबांनी त्यांच्या येण्यावर बंदी घातली होती. माझ्यामध्ये निश्चयी स्वभावाचा संस्कार आधीपासूनच होता. मी त्यांना आजोबांची नजर चुकवून मागच्या दरवाज्याने घरात घेऊन यायची. एक दिवस आम्ही सर्व मुले आणि घरातील बायकांनी मिळून पैसे जमा केले. १०-२० रुपये जमा झाले, त्यातून आम्ही दुधाचा एक ड्रम घेऊन ते दूध बाबांकरता पेढे बनवण्याकरता ब्र.कु. बहिर्णींना दिले. हे सर्व सांगण्याचा एकच उद्देश, साकार बाबांना मी अजून बघितले पण नव्हते, ना मी त्यांना ओळखत होते, तरीसुद्धा मला त्यांच्याविषयी खूप जिव्हाळा वाटायला लागला होता. अशाप्रकारे माझा ब्र.कु. परिवाराशी परिचय झाला.

आमच्या घरात एक नियम होता, आजोबा म्हणायचे घरातील प्रत्येक मुलगी उच्च शिक्षित झाली पाहिजे, जेणेकरून ती कधी कोणावर अवलंबून राहणार नाही. मी जेव्हा ज्ञानामार्गात आले त्यावेळी ब्रह्मा बाबा म्हणाले, "बाळा, तुला पुढे शिकले पाहिजे; मला (बॅरिस्टर), वकील, पत्रकार, न्यायाधीश पाहिजेत. शिकलेली मुलं पाहिजेत. 'तुम्ही नाव मोठं करा'. नंतर माझं उच्च शिक्षण ७ वर्षांनी पूर्ण झालं. त्यानंतर १ वर्ष पत्रकारीतेचा अभ्यास केला. (जरनॅलिझम) त्यानंतर कायद्याचा (लॉ) अभ्यास पूर्ण केला.

पुढे जेव्हा मी ब्र. कु. संस्थेमध्ये जायचे ठरवले तेव्हा घरच्यांकडून सुरुवातीला विरोध व्हायला लागला. १९५७ मध्ये मुलींचे वेगळे मत विचारात घेतले जायचे नाही. परंतु मी आणि माझी एक मैत्रीण, आम्ही सकाळच्या क्लासला ५

वाजता रोज जायला लागलो. कारण ब्रह्माबाबांनी एका पत्रात मला लिहिलं होतं, ''जर अमर बनायचं असेल तर सकाळच्या क्लासला उपस्थित राहणे आवश्यक (अनिवार्य) आहे.''

सगळ्या दादी आपल्या पूर्वज आहेत, मला त्यांच्या बद्दल खूप आदर आहे. मी त्यांना या कल्पवृक्षाची मूळं (मुख्य आधार) मानते.

दादी जानकी म्हणायच्या परदेशात जायचं तर दोन गोष्टी येणं आवश्यक आहे. एक जेवण बनवणे आणि दुसरे जमिनीवर झोपता येणे. मी चार भावा-बहिणींमध्ये सगळ्यात लहान असल्यामुळे मला जेवण बनवण्याची कधी वेळ आली नव्हती. परंतु दादींनी टोली आणि नंतर पोळी (रोटी) बनवायला शिकवले.

कोणी विद्यार्थी असो किंवा पैशाची गोष्ट असो, आम्ही दोन गोष्टी कायम लक्षात ठेवल्या; एक बाबांचे श्रीमत - प्रत्येक गोष्टी करता नियम ठरलेले आहेत. जे काही नियम आहेत, त्यांचे पालन झाले पाहिजे. दुसरी गोष्ट ज्या देशात राहतो तेथील कायदे आणि नियमांचे कधीही उल्लंघन करायचे नाही. या दोन्ही पैकी कोणत्याही नियमांचे उल्लंघन झाले, तर यज्ञात कोणत्या न कोणत्या प्रकारची विघ्ने येतात. सांगण्यांचा एकच उद्देश असावा, एकता टिकून राहावी आणि बाबांचे श्रीमत व जी मूल्ये आहेत ती आपल्या जीवनातून, राहणीमानातून प्रत्यक्ष व्हावीत.

एकदा दादी जानकी लंडनमध्ये असताना एक प्रश्न दादींना विचारला, संबंध आधी की सेवा आधी? दादी म्हणायच्या संबंध चांगले असतील तर तुम्हाला काय योग्य आहे ते समोर मांडता येईल, पण संबंध बिघडलेले असतील तर सत्य / योग्य गोष्ट सांगण्यास वाव राहत नाही. संबंधांना महत्व देणे गरजेचे आहे अशी शिकवण दादींनी आम्हाला दिली.

आपण नेहमी सर्वांना मनापासून सन्मान द्यावा. मी आजपर्यंत कोणालाही 'तू' अशा एकेरी नावाने कधी संबोधित केले नाही. थोरा-मोठ्यांना सर्वच सन्मान देतात. पण तुम्ही लहानांनाही सन्मान द्याल तर ते किती आनंदित होतील? कोणाला काही द्यायचंच असेल तर शुभ भावनारूपी मिठाई द्या. ''शुभ भावना द्या, शुभ भावना घ्या,'' (दुवाऐं दो, दुवाऐं लो) हेच आपल्या जीवनातील यशाचे आणि निर्विघ्न राहण्याचे मुख्य साधन आहे.

**अव्यक्ती परिवार या कार्यक्रमाची सुरुवात** : संध्याकाळी ७.३० च्या योगानंतर आत्मिक चर्चा करण्याकरता दादी जानकींच्या खोलीमध्ये मी जायचे. दादी म्हणायच्या रोज १५ मिनिटं तरी आत्मिकचर्चा करत जा. आता ते तसेच पुढे चालू ठेवायचे होते. 'अव्यक्ती परिवार नावाने मुरलीचे मनन-चिंतन करणारे एक संघटन होते, तेच संघटन पुढे चालू राहिले. दिवसभरात माझा जो अभ्यास चालतो, त्यातून मला जे अनुभव होतात ते संध्याकाळी मी सर्वांसमोर मांडते. खास करून करोना काळात जे आपल्या कुटुंबापासून दूर होते त्यांना रोज या क्लासमुळे एकटेपणाची भावना राहिली नाही.

दादी जानकी म्हणायच्या बाबांना दीपमाळ आवडते. बाबांना वेगवेगळे मणी नाही, तर त्यांची माळ आवडते. दादी म्हणायच्या माळेचे दोन मणी अगदी जवळ आहेत; पण चिकटलेले नाहीत. कोणताही मोह (अटॅचमेंट) नाही. या सृष्टीनाटकाप्रमाणे (ड्रामा) माझा लहानपणापासूनच कोणामध्येही अडकण्याचा स्वभाव नाही. प्रेम सगळयांविषयी आहे. पण कोणामध्ये अडकणं नाही.

आपला सगळ्यात पहिला संस्कार 'ईश्वरी स्नेह' आहे. आपल्या मनातून/हृदयातून स्नेह कमी का होतो? ज्यामुळे यज्ञकार्यामध्ये बाधा येईल, असे काही आपल्या हातून घडते तेव्हा स्नेह कमी होतो.

माझे व्यक्तिगत संपूर्णतेवर नेहमीच लक्ष असते. मी कितीही कार्यव्यवहार करत असले तरी माझे उद्दीष्ट नेहमीच माझ्या स्मरणात असते. मी बाबांकडे का आले? ते उद्दीष्ट मला साध्य करायचे आहे.

बाबांच्या प्रत्येक मुलाने बाबांना संपूर्ण विश्वामध्ये प्रसिद्ध करावे, त्यांचे नेहमी आपापसात स्नेहपूर्ण संबंध असावेत, एकमेकांना सन्मान द्यावा आणि नेहमी एक दुसऱ्यांना सामावून घ्यावे हीच माझी यज्ञाप्रति भावना आहे. मी तुम्हाला नक्कीच म्हणू शकते, माझा कोणाही बरोबर संघर्ष नाही. बाबा-मम्मा म्हणायचे प्रत्येकाचा स्वभाव-संस्कार वेगळा आहे, तो तसाच राहील किंवा नाही, परंतु माझा कधी त्यांच्याशी संघर्ष होऊ नये बस !

दीदी मनमोहिनी नेहमी म्हणायच्या नेहमी सुई-दोरा घेऊन फिरा, कात्री नको. चालता-फिरता तोंडाची कात्री चालू राहिली की संबंध बिघडतात. सुई-दोरा घेऊन फिरा. कोणी तुम्हाला काही बोलले, तरी काही हरकत नाही.

(पृष्ठ क्र.२० वर)

# परीकथा

## (भाग ६)

# परमात्म्याचे दिव्य अवतरण

ब्र.कु. रेखा, देगलूर



दादा, परी मला विचारत होती, ''राधा, बाळ तुला माहीत आहे का? महाशिवरात्री आपण कशी साजरी करतो व का?''

मी परीला म्हणाले, ''ते तर सर्व माझ्या आईला माहीत; पण मला जेवढं माहीत आहे ते मी सांगते तुला. महाशिवरात्रीच्या दिवशी आम्ही सकाळी लवकर उठतो. स्नान वगैरे करून शिवाच्या मंदिरात जातो. सोबत बेल, फूले, दूध, दही असं बरंच काही आई घेऊन जाते आणि धोतऱ्याच्या फुलाला आम्हाला हात लावू देत नाही कारण ते विषारी फूल आहे असं सांगते.

आम्ही सर्वजण मंदिरात गेल्यावर पुजारी काका शिवलिंगास अभिषेक करतात व शिवलिंगावर बेल वाहतो.

मला तर एवढंच माहीत आहे बघ. तू सांग ना ग, महाशिवरात्री तू कशी साजरी करतेस ?''

परी सांगू लागली, ''बाळा आपण विषारी, काटेरी फुले शिव परमात्म्यालाच वाहतो. मी आश्चर्याने विचारले, ''खरंच ना! आम्ही सगळीकडे मंदिरात जाताना गुलाब, मोगरा अशी सुगंधित फुले घेऊन जातात; पण इथेच का अशी विषारी फुले नेता आणि आम्ही जरी हात लावला तर, आई आम्हाला साबण लावून हात धुवायला सांगते. आपण का वाहतो विषारी फुले?''

दादा परी सांगत होती, ''आपण प्रत्येक मंदिरात सुगंधी फुले घेऊन जातात; पण शिव परमात्म्याला आपण विषारी फुले वाहतो, कारण बाळा तोच ते विष पचवू शकतो. विषारी फुले म्हणजे आपल्यात जे विकार आहेत, ते परमात्म्याला द्यायचे व परमात्मा आपल्याला पावन बनवतो.'' मी परीला विचारले, ''विकार म्हणजे काय गं?''

परी म्हणाली, ''आपल्यात जे एकमेकाबद्दल राग, द्वेष, मी पणाचा अभिमान, पैशाबद्दल लोभ, मुलांविषयी मोह इत्यादी बरंच काही आहे त्यालाच विकार म्हणतात. आपल्याला शिव परमात्म्याला त्या वाईट गोष्टी द्यायच्या आहेत. बाळा तू तर अजून लहान आहेस, तुला हे सर्व मोठी झाल्यानंतर व्यवस्थित कळेल आणि हो आपल्याकडून हे सर्व विकार घेऊन शिव परमात्मा आपल्याला ज्ञान, पवित्रता, सुख, प्रेम, आनंद, शांती, शक्ती देतात.''

''अय्या किती छान आहे गं!''

यावर परी म्हणाली, ''बरोबर आहे, शिव परमात्मा परम धामात राहतो. जेव्हा जेव्हा धर्माची अति ग्लानी होते, सारी सृष्टी पतित होते, दुःखी होते, अशांत होते तेव्हा परमात्मा आपल्याला विकारापासून सोडविण्यासाठी स्वतः या सृष्टीवर अवतरित होतात. आपल्याला या मायेपासून मुक्त करतात.''

मी म्हणाले, ''ते कसं काय?''

परी हसत म्हणाली, ''बाळा परमात्मा हा तर निराकार आहे म्हणजेच त्यांना आपल्यासारखं शरीर नाही. सर्व मनुष्य आत्म्यांचे कल्याण करण्यासाठी एका वृद्ध मनुष्याच्या शरीरात प्रवेश करतात म्हणजेच अवतरीत होतात. नंतर त्यांचे नाव 'ब्रह्मा' असे ठेवतात. शिव परमात्म्याच्या या अलौकिक अवतरणाच्या पुण्यस्मरणार्थ आपण महाशिवरात्री किंवा शिवजयंती साजरी करतो. बाळा शिव परमात्मा हा मातेच्या गर्भातून जन्म घेत नाही. सर्व मनुष्यात्म्यांचा तो माता-पिता, बंधू, सखा, पति, पुत्र आहे. मनुष्य सृष्टीचा बीज रूप चैतन्य शक्ती आहे. आपण सर्वजण मायेच्या कचाट्यात सापडलेले आहोत. सर्वजण पतित झाले आहेत. त्यांना यातून सोडवण्यासाठी शिव परमात्मा एका साधारण वृद्ध मनुष्याच्या शरीरात अवतरीत होतात. आपल्या सर्वांना ते शांती, पवित्रता, ज्ञान, सुख, प्रेम, आनंद, शक्ती देऊन या मायेच्या कचाट्यातून सोडवितात व राजयोगाचे शिक्षण देतात.''

मी म्हणाले, ''धर्माची ग्लानी म्हणजे काय?'' यावर परी म्हणाली, ''बाळा आपल्या भारतात अनेक धर्म आहेत त्यांच्यात एकमेकात भांडण, मारामाऱ्या, एकमेकाला लुटणे, खून करणे घडते. या जगात जसे संस्कार आहेत तसाच संसार बनलेला आहे. साऱ्यांचे संस्कार बिघडल्यामुळे सारा संसार बिघडला आहे. ही कलियुगाची, अज्ञानरूपी अंधकाराची रात्र आहे. या अज्ञानरूपी अंधकाराला दूर करण्यासाठी शिव परमात्मा स्वतः येऊन आपल्याला ज्ञानरूपी प्रकाश देऊन हा अंधकार दूर करत आहेत. शिवलिंगावर कलश ठेवतो. त्यामध्ये पाणी ठेवल्यामुळे थेंब थेंब शिवलिंगावर पडत असते तसंच शिव परमात्मा सुद्धा आपल्याला ज्ञानाचं अमृत थेंब थेंब पाजत आहेत. आपल्या बुद्धीरूपी कलशामध्ये हे ज्ञान पडत आहे. जसं आपल्याला हे ज्ञान धारण होत जातं तसं आपले विकार दूर होतात. आपले विचार श्रेष्ठ बनतात.'' एवढं बोलून परी थांबली. मी परीला लगेच म्हणाले, ''परी तू मला एक प्रॉमिस करशील का?'' परी म्हणाली, ''कोणते?'' मी म्हणाले, ''मी कुठेही गेले तरी तू मला अशी छानशी एक गोष्ट सांगायला येशील ना ग! परी मला पक्का वाला प्रॉमिस कर.'' परी म्हणाली, ''हो बाळा! तू कुठेही गेलीस तरी मी तिथे येऊन तुला आपल्या शिवबाबाची गोष्ट नक्की सांगेन. तुला आवडतात ना बाळा या गोष्टी.'' मी म्हणाले, ''हो! मला खूप खूप आवडतात.'' परीने माझ्या हातावर हात ठेवला व मला पक्का वाला प्रॉमिस केले. मग लगेच ती दिसेनासी झाली. ''अरे दादा, मला तिला थांबवायचं नव्हतं; पण तिची जादूची कांडी मात्र माझ्या हातात थोडा वेळ धरायची होती. पण ती एकदम दिसेनाशी झाली.'' राधा थोडी हिरमुसली झाली होती. लगेच म्हणाली, ''दादा जेव्हा ती पुन्हा माझ्या स्वप्नात येईल ना तेव्हा मात्र मी सुरुवातीलाच तिची जादूची कांडी हातात घेऊन बघेन.'' आम्ही सर्वजण थोडेसे बाजूला बसून चिमुकल्या बहीण भावाच्या गप्पा- गोष्टी ऐकत होतो. त्यांनी आमच्याकडे पाहिले व हसत हसत दोघेही बागेत खेळण्यासाठी निघून गेले. मी बाबांना मनोमन धन्यवाद देऊन एक ओवी म्हटली,

पहिली माझी ओवी ग! महाशिवरात्रीच्या दिनी,
नवी दुनिया स्थापनेला ,
आले हो माझे शिवबाबा!
मग आम्ही आमच्या कामाची सुरुवात केली.

***

---

(पृष्ठ क्र.३ वरुन)

शांतपणे विचार केला तर लहान मुलांनाही अशा प्रकारची साधना शिकणे गरजेचे आहे. कारण प्रचलित शिक्षणक्रमात बाह्य जगताची माहिती मिळते; पण मन आवरायचे ज्ञान होत नाही. म्हणून काही विद्यार्थी अपयश पचवू शकत नाहीत. आत्मघात करतात म्हणजे मन आवरायची कला न साधण्याचा परिणाम. स्वामी विवेकानंदाना एकदा विचारले होते, 'तुमच्या हाती देशाचा कारभार दिला, तर तुम्ही काय कराल?' स्वामीजी म्हणाले, 'जुजबी आकडेमोड आणि भाषाज्ञान दिल्यावर त्या मुलांना मी मन एकाग्र करण्याचे प्रशिक्षण पहिले देईन. त्यात ती मुले पारंगत झाली की मग इतर विषय आणि पुढचा अभ्यासक्रम'. देव-देव हे म्हाताऱ्यांनी करण्याचा प्रकार आहे, असे अनेकदा म्हटले जाते. पण तरुण वयात स्वभाव बदलायचा प्रयास नाही केला, तर नंतरच्या वयात प्रयत्न कसे सफल होणार? तात्पर्य मन-बुद्धी एकाग्र करण्याच्या साधनेची गरज सगळ्यांना आहे. असे करण्याने समाज बदलू शकेल.

याकरिता राजयोगाच्या साधनेचा अभ्यास करण्यातून जो समाज घडेल त्याद्वारे भ्रष्टाचाराचे खरे निर्मूलन शक्य आहे. अशा परिवर्तनाची प्रक्रिया सुरू झाली आहे. शिव परमात्मा येऊन राजयोगाचे शिक्षण देत आहे. याबद्दल समजून घेणे अगत्याचे आहे. नुसते समजून घेणे नाही, तर त्यानुसार आचरण करणे गरजेचे आहे. यातूनच समाजपरिवर्तन घडेल.

***

---

## सुविचार

जगाने तुम्हाला भलं म्हणावं असं वाटत असेल तर तुम्ही स्वतःची स्तुती करू नका - पास्कल



# जेथे श्रवणाचा उपाये

ब्र. कु. बाळू, सोलापूर

नवविधा भक्तीतील पहिली पायरी श्रवण आहे आणि चढत्या भाजणीने शेवटची पायरी आत्मनिवेदनाची आहे. श्रवण करणे म्हणजे काय करणे? साधा अर्थ घेतला तर ऐकणे; पण खरं म्हटलं तर लक्षपूर्वक ऐकणे म्हणजे श्रवण. रस्त्यातून जाता-येता अनेक आवाज कानी येतात म्हणून त्यांचे श्रवण करतो असे होत नाही ना! इंग्रजीतसुद्धा To Hear and To Listen अशी दोन क्रियापदे याकारणासाठी वापरतात. आपण रोजची ज्ञानमुरली ऐकतो त्याचे अनन्यसाधारण महत्त्व आपल्या आध्यात्मिक प्रवासात आहे. या विषयाचा विस्तार पाहण्यापूर्वी एक छोटीशी बोधकथा विचारात घेऊया.

एक गुरु आपल्या काही शिष्यांसह आश्रमात राहत असे. रोज सकाळी स्नानाच्या वेळी आपले कपडे आणि पितळी कमंडलू स्वच्छ करीत असे. 'रोज ते कमंडलू काय घासायचे?' असा प्रश्न एका शिष्याने गुरुस केला. गुरु हसून म्हणाले, "बरोबर आहे तुझे" आठ दिवसानंतर कमंडलू काळवंडू लागले. एका महिन्यात त्याचे रंगरुपच बदलले. मग शिष्यास स्वतःहून वाटले आणि तो साफ करू लागला. पुष्कळ प्रयत्नानंतर कमंडलू स्वच्छ झाले तरी पूर्वीची चमक नव्हती. गुरुने फक्त एक सहेतुक नजर टाकली आणि शिष्याला आपली चूक उमगली. गुरु म्हणाले, "साधकाने फार सजग राहावे लागते. जरा गल्लत केली तरी मनावर मळ चढू लागतो याकरिता दिनचर्या महत्त्वाची."

आपल्या दिनचर्येत नित्य ज्ञानमुरली श्रवण हा जीवनाचा पाया आहे. साकार बाबा म्हणत असत, "जो नित्य श्रवण करीत नाही तो जणू माझा मुलगाच नाही." का बरे इतके महत्त्व आहे, रोज ज्ञानमुरलीचे श्रवण करण्यामागे?

१) सर फ्रान्सिस बेकन म्हणतात, Conference makes a ready man. इथे Conference शब्दाचा अर्थ परिषद असा न घेता परिषदेतील संवाद ऐकणे अशा अर्थी घेऊन पहा. रोजच्या ज्ञानमुरली वर्गात बसणे म्हणजे एखाद्या परिषदेस बसण्याप्रमाणेच आहे. तिथे श्रवण घडते, कधी ज्ञानचर्चा घडते, विचारांचे आदान-प्रदान होते आणि आपण सहजपणे सम्पन्न बनत जातो. Ready man याचा अर्थ भरपूर होणे असा घेतला तर आपल्या लक्षात येईल.

२) श्रवणामध्ये आपण फार मेहनत घेत नाही. फक्त बसून एकाग्रपणे ऐकायचे आहे. जे कानावर पडते ते मनांत साठवायचे आणि आचरणात आणण्याकरिता योजना आखायची. आखलेल्या योजनेनुसार कृती करायची.

३) श्रवणातून आनंदनिर्मिती होते. एखादे उत्तम गाणे ऐकल्यावर आपला मूड बदलतो कारण कानाचा मनाशी जवळचा संबंध आहे. रोजची मुरली हा संवाद आहे. संवाद एकापेक्षा जास्त व्यक्ती असतील तरच घडतो. ज्ञानमुरलीत बाबांचे उद्गार आपण ऐकतो ते जसेच्या तसे मनाच्या गाभ्यात प्रवेश करतात. भक्तीमार्गातही अनेक ग्रंथ संवाद रुपात आहेत. उदा. दासबोध, ज्ञानेश्वरी इत्यादी जरी लिखित रुपात ग्रंथ असला तरी ग्रंथकर्ता संतकवी म्हणतो, श्रोते हो, सावधचित्त होऊन ऐका!

४) श्रवणाच्या जोडीला टिपणे काढणे हे आदर्श विद्यार्थ्यांच्या लक्षणातील एक लक्षण आहे. आपण ऐकलेले लिहून काढले की जणू ते दोनदा ऐकण्याप्रमाणे सहज लक्षात राहू लागते.

लॉकडाऊनचे आवश्यक ते नियम पाळूनच आपण श्रवण साधना करीत होतो. फक्त एकदा अंतर्मुख होऊन आपण स्वतःला विचारुया, माझे लक्ष त्या काळात किती प्रमाणात एकाग्र होते? मी टिपणे काढतो का?/काढते का? संतांनी लिहून ठेवले आहे.

(पृष्ठ क्र.२० वर)



# प्रकाशवाटा
## भाग - १
## दृष्टिभेट

ब्र.कु. सुभाषभाई, ज्ञान सरोवर, आबू पर्वत

**मागील एक वर्ष 'शिकण्यासारखं बरंच काही' या सदराद्वारे भ्राता जगदीशचंद्रजींच्या जीवनातील प्रेरणादायी अनुभव मांडले. अनेक वाचकांकडून खूप चांगला प्रतिसादही मिळाला. संस्थेच्या पूर्वाश्रमीच्या मुख्य प्रशासिका दादी प्रकाशमणी यांच्या जीवनातूनही खूप काही वेचता आलं. त्यातलं मोजकंच येत्या काही भागात 'प्रकाशवाटा' या सदरात देत आहोत. आशा आहे आपल्याला त्यातून काही नवप्रेरणा लाभेल. – संपादक**

ही गोष्ट १९७८ ची आहे. त्यावेळी मी विद्यार्थी दशेत होतो. आमच्या येथील गुजरवाडी गीता पाठशाळेला सूचना मिळाली, सुनंदा बहन यांनी कोल्हापुरात विश्व शांती मेळ्याच्या उद्घाटनासाठी ब्रह्माकुमारी संस्थेच्या मुख्य प्रशासिका आदरणीय प्रकाशमणी दादीजी येणार आहेत. त्यामुळे त्याच दिवशी आम्हा सर्वांना मीरा बहन यांनी सातारा सेवाकेन्द्रावर बोलावणे धाडले. कारण पुण्याहून कोल्हापुरास जाते वेळी सातारा सेवाकेंद्रावर थांबून दादीजी तिथे प्रवचन आणि भोजनही करणार होत्या. आम्हा सर्वांच्या मनात खूप उत्साह होता की, आज आम्ही आबूहून येणाऱ्या एका महात्म्याचे दर्शन करणार आहोत. जवळ जवळ एका तासाचा बसचा प्रवास करून मी, माझी आई आणि तुळशीभाईंना घेऊन १०-१२ मातांसहित आधी साताऱ्याला पोहोचलो. आलिशान इमारती आणि रस्ते, मोठी मोठी दुकाने मी पहिल्यांदाच बघत होतो. आम्ही सेवाकेंद्रावर पोहोचलो. सर्वच जण दादींच्या स्वागतासाठी आतुर झाले होते. शेवटी प्रतीक्षा संपून दादींजीचे आगमन झाले आणि सर्वांच्याच मनात आनंद लहरी उसळल्या. मी भिंतीला टेकून सर्वांच्या पुढे बसलो होतो. एवढ्यात आपल्या हातात काठी घेऊन एक बडी व्यक्ती तिथे आली. त्यांना भिंतीला टेकून मी जिथे बसलो होतो नेमके त्याच जागेवर बसवण्यात आले. त्यामुळे मला तिथून थोडे पुढे सरकावे लागले. ते पुण्यातील गोविंदकाका होते.आता मी एकदम दादींच्यापाशी बसलो होतो. आदरणीय दादीजींबरोबर मोहिनी बहन, इन्द्रा बहन, लीला बहन आणि सुंदरी बहनजी बसल्या होत्या.


क्लासच्या वेळी दादींनी ५ कन्यांना आपल्या समोर बोलावून समर्पित ब्रह्माकुमारी बनण्याची शपथ देऊ केली. त्यानंतर दादींनी सर्वांना टोली (प्रसाद) दिला. तिथेच माझी दादीजींशी दृष्टिभेट झाली. माझ्या आयुष्यातील तो एक अविस्मरणीय क्षण ठरला. दादीजींच्या नेत्रातून अलौकिक शक्तीची जणू किरणेंच माझ्यावर वर्षाव करत होती. डोळ्यांत अवर्णनीय शक्ती होती. त्यांचे अलौकिकपण डोळ्यांतून जणू बरसत होते.

एवढ्या महान पुण्य आत्मा असूनही त्यांच्यात खूप साधेपणा होता. हे अगदी जाणवत होते. जेवणानंतर दादी कोल्हापूराला जायला निघाल्या इथेच मला दादीजींचे पहिले अलौकिक दर्शन झाले.

***

**सुविचार**

प्रेम आणि सत्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत – महात्मा गांधीजी



# माझे सर्वस्व – बाबा

ब्र.कु. जगरूप, दिल्ली

मी या ज्ञानमार्गात गेली पन्नासहून अधिक वर्षे आहे. शिवपरमात्म्याचे हे दिव्यज्ञान माझे जीवन पालटवण्यास कारणीभूत झाले. मी मिलेट्रीत सेवा करत होतो. ही गोष्ट १९७०च्या आधीच्या काळातली आहे. सर्वसाधारणपणे आर्मीतल्या माणसाला मांसाहार, मद्य अति सहज उपलब्ध असते आणि त्याची सवय सहज लागते. मीही त्याला अपवाद नव्हतो. माझ्या जीवनात मांसाहार आणि मद्यसेवन एक स्वाभाविक अंग झाले होते. हे काही वाईट आहे असे वाटण्याचे काहीच कारण नव्हते. मी काही खूप भाविक, श्रद्धाळू नव्हतो; पण निरीश्वरवादीसुद्धा नव्हतो. जीवन लौकिक अर्थाने सुरळीत चालले होते. पुण्याहून गोव्याला जात होतो त्यादरम्यान माझ्या एका मित्राने ईश्वरी ज्ञानमार्गाशी संबंधित एक पुस्तक दिले होते. वेळ घालवण्याकरिता मी ते चाळत गेलो आणि माझा वाचनातला रस वाढत गेला. वाचता वाचता मला जाणवलं मी जणू काही एक चमकणारा हिरा आहे. भृकुटीमध्ये आत्म्याची अनुभूती होऊ लागली आणि आत्मानंद झाला. असा अनुभव पहिल्यांदाच होत होता. माझे कुतूहल वाढत गेले आणि मी साप्ताहिक पाठ्यक्रम पूर्ण केला आणि ज्ञानमार्गावर कसा चालू लागलो ते मलाही कळलं नाही.

माझ्या वाईट सवयी अशा काही सुटल्या, जणू त्या माझ्या नव्हत्याच. माझे पोस्टींग चंडीगढला होते. मी सायकलवर ज्ञानमुरली श्रवण करण्यास जात असे. ज्ञानमुरलीद्वारे मिळणाऱ्या ज्ञानबिंदूंची मला शुद्ध चटक लागली. त्याकाळी एकदा आमच्या सेवाकेंद्रावर प्रकाशमणी दादी आणि मनोहर दादी आल्या होत्या. विश्वरूपी नाटकातील महत्त्वाची गोष्ट आहे, अचूक पुनरावृत्ती. त्यानुसार मी विचार केला की आज मी विशेष वेळ काढून दादींच्या क्लासला गेलो तर प्रत्येक कल्पात मी असाच उपस्थित राहीन. या भावनेतून मी दादींच्या क्लासला गेलो आणि अनेक गहन ज्ञानबिंदूंचे स्पष्टीकरण मिळाले. त्यानंतर मी ठरवले, अशा संधी भविष्यात कधीही सोडणार नाही. अशा प्रसंगांतून माझी रूची वाढत गेली. काही ज्ञानबिंदू हृदयास स्पर्श करून गेले. उदा.

१) प्रत्येक ज्ञानमुरलीत बाबा म्हणतात, मीठे बच्चे म्हणजे मधुर मुलांनो! कुणाच्या मनात विचार येऊ शकतो – मी मधुर नाही, तर बाबांचे म्हणणे कसे स्वीकारू ? ईश्वर सत्य आहे, त्याचे प्रत्येक वचन सत्य आहे. मग ईश्वर मला 'मधुर स्वभावाचा' असे संबोधतो, तर मी त्यात संदेह कसा आणू शकतो? 'संशयात्मा विनश्यन्ति' म्हणतात. रोजच्या एका शब्दावर आपण गहन चिंतन करणे आवश्यक आहे, त्यावर विश्वास ठेवणे गरजेचे आहे.

२) बाबा म्हणतात, 'मी तुम्हाला एवढं श्रेष्ठ ज्ञान देतो, त्याद्वारे तुम्हीसुद्धा प्रति ज्ञानसागरच बनला.' या वचनावर विश्वास ठेवणे गरजेचे आहे. जाणिवेच्या पातळीवर हे उतरलं पाहिजे. असे प्रत्येक ज्ञानबिंदूबाबतचे चिंतन वाढत गेले आणि माझ्या निश्चयाची पातळी उंचावत गेली.

वाढत्या निश्चयामुळे शुद्ध आध्यात्मिक कैफ वाढत गेला. आपल्या संस्थेचा बॅच मी आर्मीच्या पोशाखावर लावू लागलो. इतकेच नव्हे, माझ्या आर्मीच्या मेडल्सच्यावर संस्थेचा बॅच लावू लागलो. आर्मीच्या रिवाजानुसार मेडल्सच्या वरच्या बाजूस इतर काही चिन्हे, पदक लावायचे नाही असा संकेत आहे. माझी ही सवय माझ्या काही हितशत्रूंनी अधिकाऱ्यांच्या कानावर पोहोचवली. परिणामस्वरूप मी ज्ञानमुरली श्रवणासाठी जात असे ते बंद करण्यात आले. मी आर्मीचे आदेश मोडू शकत नव्हतो. मुरलीसाठी जीव तळमळत असे. त्यावेळेस ध्यानी दादी मला छापील मुरली कसेही करून पोहोचवत असत. मुरलीमध्ये मी वाचत असे, ज्यांच्याशी आपला कर्मभोग जोडला आहे अशा मनुष्यात्म्यांकरिता योगबलाचा वापर

करा. मी योगशक्तीचा प्रयोग सुरू केला. वरिष्ठ अधिकाऱ्यांविषयी शुभभावनांचे प्रकंपन जाणीवपूर्वक प्रसारित करू लागलो आणि काय आश्चर्य ! सात-आठ दिवसांत माझे वरिष्ठ अधिकारी माझ्या बराकीत आले. हाताखालच्या माणसाला अधिकारी कक्षात बोलावले जाते. इथे उलटे घडले. आल्यावर ते म्हणाले, ''तू आपल्या सत्संगात जाऊ शकतोस, काहीच अडचण नाही.'' मी मनोमन आनंदलो आणि विचारले, ''काय झाले, तुम्ही आक्षेप घेत होता आणि अचानक परिवर्तन?'' त्यांनी सांगितले, ''गेल्या पाच-सात दिवसांपासून मला रोज हनुमंताचे स्वप्नात दर्शन घडतेय. मी हनुमंतासोबत मोठी सेना पाहतो आणि असं वाटतं ती सेना माझ्यावरच चढाई करून येणार आहे. तू जी काही साधना करत आहेस त्यात व्यत्यय आणता कामा नये असे हनुमंतच मला सांगतोय.'' माझे वरिष्ठ अधिकारी हनुमंताचे निस्सीम भक्त होते, हे वेगळे सांगायची गरज नाही.

अशा रीतीने माझा या ज्ञानमार्गातील प्रवास सुकर होत गेला. मी स्वेच्छानिवृत्ती घेतली आणि गेली अनेक वर्षे दिल्लीत समर्पित जीवन जगत आहे. शिवबाबांच्या अगाध कृपेची जणू वृष्टीच माझ्यावर होत आहे. अजून काय म्हणणार !

***

(पृष्ठ क्र.४ वरुन)

आहे. माझ्या मनात जर त्याच्या विषयी द्वेष, तिरस्कार असेल तर त्याचा परिणाम, मलाच त्रास होतो. त्याला काहीच फरक पडत नाही.

या अशा परिस्थितींना सामोरे जाण्यासाठी आपली आत्मिक शक्ती ही मजबूत पाहीजे. आत्मिक शक्ती जेवढी मजबूत तेवढीच दुसऱ्यांना सामावून घेण्याची कला ही सहज साधता येते. मग ती एक नैसर्गिक प्रक्रिया होते व कोणत्याही घटनेचा वा गोष्टीचा माझ्या चित्त पटलावर काहीच परिणाम होत नाही. साध्या सोप्या गोष्टी आपण सहज पचवू शकतो पण एखादी, मोठी वाईट घटना घडली तर त्या गोष्टीचा ठसा आपल्या मनावर उमटू द्यायचा नसेल, तर आत्मिक शक्ती ही वृद्धींगत व्हायला हवी. या शक्तीद्वारे मी साहजिकच माझ्यात बदल घडवून आणू शकतो व माझी सगळी कामे ही सहजतेने पार पाडू शकतो. मी, इतर माझी कार्मिक संबंधे आहेत त्यांना सुधारण्यास मदत करू शकतो व सर्वांशी एक खेळीमेळीचे हलके-फुलके वातावरण तयार होण्यास मदत होते. कठीण अशक्य-गोष्ट पण सहज साध्य होऊ शकते. अशाप्रकारे परमात्म्याच्या सहाय्याने या सृष्टीवरती आत्मिक दृष्टी व वृत्तीद्वारा एक सुंदर संसार उभा करण्यास हातभार लावू शकतो.

***

(पृष्ठ क्र.१४ वरुन)

त्यांची थोडी प्रशंसा करा, त्यामुळे तो पण तुमच्याशी स्नेहानी बांधला जाईल.

जेव्हा मला अतिरिक्त मुख्यप्रशासिका या कार्यभाराकरता विचारले गेले, तेव्हा मी तीन वेळा नकार दिला होता. मी सेवा करीन, नेहमी उपस्थित राहीन, पण मला हे नाव नको. तेव्हा आदरणीय निर्वैर भाई म्हणाले, आपल्या यज्ञाला तुमच्या या पदाची आवश्यकता आहे. तेव्हा मी म्हणाले, ठीक आहे, तुमच्या म्हणण्यानुसार मी स्वीकार करेन.

फारच थोडा वेळ राहिला आहे, आपल्या सर्वांना मिळून हा यज्ञ एकात्मतेने, प्रेमाने, योग बळाने, विघ्नरहित होऊन पूर्णत्वास न्यायचा आहे.

आपल्या सर्वांमधील एकता आणि प्रेम अबाधित राहो.

(पृष्ठ क्र.१७ वरुन)

आता श्रवण केलियाचे फळ। क्रिया पालटे तात्काळ।।
तुटें संशयाचे मूळ। येकसरां।।

अनेकदा मनांत असलेल्या शंकांचे निरसन नित्य श्रवणात घडून येते. अनेक संदेह फिटतात याचा प्रत्यय येतो. प्रश्न आहे एकाग्रतेने, तन्मयतेने श्रवण करण्याचा. असे श्रवण करणे हीदेखील एक साधना आहे. आपल्या ज्ञानयज्ञातील मातेश्वरी जगदम्बा अर्थात् मम्मा किती तल्लीन होऊन मुरली ऐकत, याबद्दल आपण अनेकदा वाचले आहे, ऐकले आहे. त्यांचे अनुकरण करणे हा आपल्या नित्य सहजसाधनेचा भाग होऊन जावा हीच शुभेच्छा!

***



# शब्दरूपी दौलत

ब्र.कु. उमेश, सांगली

एका गावामध्ये दोन मित्र रहात होते. एकाचे वय १२ वर्ष आणि दुसऱ्या मुलाचे वय ८ वर्ष होते. एके दिवशी खेळत असताना मोठा मुलगा चेंडू आणण्यासाठी विहिरीजवळ गेला असता त्याचा पाय घसरून विहिरीत पडला. लहान मुलाने आपल्या आजूबाजूला पाहिले असता मदतीसाठी कोणीही दिसत नव्हते. तेव्हा त्या लहान मुलाने विहिरीजवळ असलेली बादली आणि दोर विहिरीमध्ये सोडला. मग विहिरीत पडलेल्या मोठ्या मुलास बादली आणि दोर पकडण्यास सांगितले. मग तो लहान मुलगा त्या मोठ्या मुलास विहिरीतून बाहेर काढण्यासाठी मदत करू लागला.

बराच वेळ मेहनत करून, आपली सर्व शक्ती पणास लावून त्या मोठ्या मुलास विहिरीबाहेर काढले. मग दोघांनी असा विचार केला की घडलेली सर्व हकिकत गावातील सर्वांना सांगूया. त्यांना वाटले सर्व नाराज होतील, रागावतील. परंतु घडले वेगळेच. सर्व लोकांनी त्या मुलांची गोष्ट मनावर घेतली नाही. कारण त्या सर्वांना असे वाटले, आठ वर्षाचा मुलगा बारा वर्षाच्या मुलास विहिरीतून बाहेर कसा काढू शकेल? हे कसे शक्य आहे?

परंतु गावातील एका समजुतदार, वयस्कर माणसाला ती गोष्ट पटली. सर्व लोकांनी त्या वयस्कर माणसास विचारले की, आपणांस या गोष्टीबद्दल काय वाटते?

ही मुले खरं सांगत आहेत का? कारण आठ वर्षाचा मुलगा बारा वर्षाच्या मुलास विहिरीतून बाहेर काढू शकेल? तेव्हा त्या वयस्कर माणसाने लोकांना सांगितले, या लहान मुलाने अशक्य अशी गोष्ट केलेली आहे. कारण त्यावेळी त्यांच्या आजू-बाजूला त्यांना सांगण्यासाठी कोणीही नव्हते की तू हे काम करू शकणार नाहीस. कारण त्या वेळेस त्याचे विचार अतिशय चांगले होते.

चांगल्या शब्दाची रचना सुद्धा शक्तीशाली असते. वरील घटनेचे हे सार आहे. खरोखर शब्दात सुद्धा पुष्कळ ताकद असते. त्याचे कारण असे की, चांगल्या विचारांनी भरलेल्या शब्दांच्याद्वारे न होणारे कामसुद्धा होऊ शकते.

जसे शब्दांच्या शक्तीतून आपणांस प्रेम मिळते. तर त्याच शब्दापासून वैरदेखील होऊ शकते. काही शब्दांपासून (सुविचार) चांगले विचार व्यक्त होऊ शकतात आणि काही शब्दांपासून (कुविचार) वाईट विचारही व्यक्त होऊ शकतात. तसेच शब्दांचा आशय मोठा असतो. चांगल्या शब्दात विचार पेलण्याची ताकद असते. परंतु मानवाच्या जीवनाला दोनच शब्द दु:खी करतात. ते शब्द आहेत 'मी आणि माझा'.

मोठ्या व्यक्ती नेहमी आपले शब्द विचार करून बोलतात. कारण शब्दामुळे आपल्याला सन्मान पण मिळतो तसेच काही शब्दांमुळे अपमान देखील होतो. म्हणून शब्द जपून वापरावेत. कधी कधी मनुष्य बोलताना चुकतो तेव्हा त्या मनुष्यास आपले शब्द परत घ्यावे लागतात आणि त्या शब्दाबद्दल माफी पण मागावी लागते.

महान व्यक्ती नेहमी आपले शब्द जपून वापरतात. नेहमी सकारात्मक शब्द लोकांमध्ये उत्साह निर्माण करतात आणि तेच शब्द पुष्कळ उंचीवर त्यांना पोहोचवतात आणि हीच आहे शब्दाची शक्ती.

चांगल्या शब्दांच्या शक्तीमुळे बिघडणारी कामेसुद्धा चांगल्या प्रकारे होतात.

संत कबीर म्हणतात,

'बोली एक अनमोल है, जो कोई बोलै जानि, हिये तराजु तौलिके, तब मुख बाहर आनि ।।'

म्हणजे चांगली व्यक्ती आपल्या हृदयरुपी तराजूत तोलून मापून मगच निवडलेल्या शब्दांना मुखातून बाहेर येऊ देतात.

चांगल्या शब्दामुळे चांगले विचार अनुभव सिद्ध करू

(पृष्ठ क्र.२६ वर)



# योगक्षेमं वहाम्यहम् ।

शब्दांकन : ब्र. कु. सुजाता, बोरीवली

**पुण्यातील ज्ञानेश्वरभाई यांनी घेतलेली एक मुलाखत शब्दरूपात देत आहोत. आपल्यापैकी अनेकांना आठवत असेल, दोन दशकांपूर्वी अमेरिकेत ट्विन टॉवरवर घातपाती हल्ला झाला. ते टॉवर जमीनदोस्त झाले आणि अनेकांनी आपले प्राण गमावले; तसेच अनेकजण आश्चर्यकारकरित्या वाचलेदेखील. असाच एक रोमांचकारी अनुभव देत आहोत.**

मित्रांनो नमस्कार मी ज्ञानेश्वर बर्वे. आज एक वेगळा अनुभव आपल्यासमोर सादर करत आहोत. ११ सप्टेंबरची आठवण जेव्हा आपण जागवतो, ती तारीख आणि तो दिवस समोर येतो तेव्हा प्रथम डोळ्यासमोर येतो तो वेदनादायक प्रसंग. वल्डट्रेड सेंटर, तिथे जो धमाका झाला तो कसा पडला? हा सर्व प्रसंग वेदना निर्माण करतोच परंतु मनावर फार मोठा आघात करून जातो. तो प्रसंग बहुतेकांनी वर्तमानपत्रातून वाचला असे, टीव्हीवर पाहिला असेल. त्या प्रसंगी प्रत्यक्ष हजर असणारे खूप लोक होते. आणि तिथे प्रत्यक्ष असतानासुद्धा भगवंताच्या कृपेने ज्यांचे प्राण वाचले असे सुद्धा बरेच लोक आहेत. आणि अशा लोकांना भेटायला जेव्हा योग येतो तेव्हा खूप छान वाटते. अशीच एक व्यक्ती राम प्रकाश भाई मला त्यांच्यासोबत संभाषण करण्याचे भाग्य मिळाले. प्रथम मी त्यांचे स्वागत करतो आणि त्यांना स्वतःचा परिचय देण्याची विनंती करतो.

**ज्ञानेश्वर भाई :** रामप्रकाश भाई आपले खूप खूप स्वागत आहे.

**रामप्रकाश भाई :** धन्यवाद ज्ञानेश्वर भाई. माझे नाव राम प्रकाश आहे आणि मी सिव्हिल इंजिनियर आहे मी १९७४ ला इंजिनिअरिंग करून १९७७ ला अमेरिकेमध्ये आलो.

ज्ञानेश्वर भाई : अमेरिकेत तुम्ही १९७७ ला आलात आणि ही दुर्घटना केव्हा झाली?

**रामप्रकाश भाई :** ही दुर्घटना २००१ सप्टेंबर मध्ये झाली आणि मी इंजिनियर म्हणून तिथे काम करत होतो.

ज्ञानेश्वर भाई : वर्ल्ड ट्रेड सेंटर मध्ये तुम्ही काम करताना तेथे प्रत्यक्ष हजर होतात, बरोबर? मग आता तुम्ही आम्हाला सेंटरमधील परिस्थिती सांगा. असे सर्वश्रुत आहे की वर्ल्ड ट्रेड सेंटर सर्वांना आकर्षित करणारी एक आलिशान बिल्डींग होती.. कोणत्या मजल्यावर तुम्ही होता?

**रामप्रकाश भाई :** मी ६४ व्या मजल्यावर होतो. वर्ल्ड ट्रेड सेंटर आलिशान आहे म्हणता तर, मी तुम्हाला एक उदाहरण सांगतो. दोन्ही टॉवर ११० मजल्यांचे होते. प्रत्येक मनोरा एक एकरचा होता सोबत अजून पाच टॉवर होते. सर्व मिळून १६ एकर चे बांधकाम होते आणि सहा मजले जमिनीखाली बांधकाम होते, असे जगात कुठेच नाही.

**रामप्रकाश भाई :** काय झाले? हा प्रसंग घडला त्यावेळी लोकांची भय आणि गोंधळापेक्षा चिडचिड ही अवस्था जास्त होती. कारण सतत ओरडत होते अजून पुन्हा नाही. इतक्या उंच इमारतीत पुन्हा जायचे नाही. कारण १९९३ मध्ये बेसमेंट मध्ये एक धमाका झाला होता, तेव्हा लोकांना बिल्डिंगमधून खाली येण्यास सहा तास लागले होते. अंधारात आणि थंडीचा काळ होता तो. त्यामुळे सर्वांना वाटत होते काय माहीत! आता किती वेळ लागेल? बऱ्याच जणांनी वरतीच राहणे पसंत केले होते की सूचना मिळाल्यावरच खाली जाऊ. परंतु मी खाली उतरून जाणे पसंत केले. की नंतर काय होईल ते पाहू आणि मी खाली उतरायला सुरुवात केली...

**ज्ञानेश्वर भाई :** आपण खाली उतरण्याचा निर्णय केला आणि उतरण्यास सुरुवात केली. बरे झाले खूप छान!

**रामप्रकाश भाई :** वर्ल्ड ट्रेड सेंटर पहिल्या टॉवरची मला माहिती होती. त्यामुळे लोकांनी मला सुरक्षित मार्गाबद्दल विचारले. मी सांगितले की जेव्हा अपघात स्थळावरून बाहेर निघायचे असते. त्यासाठी आपत्कालीन मदत व्यवस्था

असते आणि जेव्हा अशी आणीबाणी असते तेव्हा ताबडतोब ती जागा सोडायची असते. म्हणून आम्ही निघालो. जे काही असेल ते खाली उतरून पाहू या विचाराने.

आम्ही खाली उतरत होतो तेव्हा दुसरे विमान येऊन दुसऱ्या टॉवरवर आदळले. सुरुवातीस कळले नाही. परंतु लोकांनी जेव्हा दुसरे विमान आले असे ओरडायला सुरुवात केली तेव्हा कळले, हा अपघात नाही अतिरेकी हल्ला आहे. पण मी लोकांना शांत राहण्यास सांगितले जेणेकरून त्यांनी गोंधळून जाऊ नये.

**ज्ञानेश्वर भाई :** किती लोक असतील एका मजल्यावर? जसे आपण म्हणालात, मजला खूप मोठा होता आणि आपण ६४ व्या मजल्यावरून खाली उतरण्यास सुरुवात केली तेव्हा किती लोक तिथे होते?

**रामप्रकाश भाई :** मला तशी काही नक्की कल्पना नाही परंतु अंदाजाने साठ-सत्तर लोक असतील. पण आमच्या विभागातच पंचवीस लोक होते मॅनेजमेंटचे. उतरायला सुरुवात केली तसे इतर मजल्यावरून सुद्धा लोक येत गेले.

**ज्ञानेश्वर भाई :** जिना एकच होता का?

**रामप्रकाश भाई :** वास्तविक जिने तर खूप मोठे होते परंतु जखमी लोक सुद्धाबरोबर होते.

**ज्ञानेश्वर भाई :** अच्छा लोक जखमी पण झाले होते?

**रामप्रकाश भाई :** हो. कारण पोलीस वाले आणि अग्नी सुरक्षा दलाची लोकं वर जात होती. बचाव कार्याचे खूप सामान त्यांच्याकडे होते. त्यामुळे मध्ये मध्ये आम्हास थांबावे लागे. आम्ही खाली उतरत होतो परंतु ते वर जात होते. लोकांच्या सुरक्षित सुटकेसाठी. मला आज सुद्धा खूप भारी वाटते त्यांचे कार्य पाहून.

**ज्ञानेश्वर भाई :** खरंच. अग्निशमन दलाचे लोक आणि पोलिस किती महान कार्य करतात! आपले प्राण पणाला लावून नाही? त्यांना साधारण किती वेळ लागला असेल तुम्हा लोकांना खाली उतरवण्यास?

**रामप्रकाश भाई :** जेव्हा दुसरा टॉवर कोसळला त्याच्या रॅबिट (मलब्या) मुळे आमचा जिना बंद झाला. मग आम्हाला दुसऱ्या जिन्याने जाण्यास सांगितले. तेव्हा आम्ही अंदाजे ते ३३ किंवा ३४ व्या मजल्यावर होतो.

**ज्ञानेश्वर भाई :** अरे बापरे! दुसऱ्या टॉवरच्या मलब्यामुळे तुमच्या जिन्याचा बाहेर येण्याचा रस्ता बंद झाला मग?

राम प्रकाश भाई : या सर्व गडबडीत लक्षात आले नाही. परंतु दुसऱ्या जिन्यावरून आम्ही खाली उतरत होतो.

**ज्ञानेश्वर भाई :** खरंच खूप उत्कंठावर्धक आहे. पुढे पुढे काय झाले याची उत्सुकता सर्वांनाच आहे.

**रामप्रकाश भाई :** जेव्हा आम्ही जिना बदलला तेव्हा अचानक जिन्यावर पाणी जमायला लागले कारण आपत्कालीन अग्निसुरक्षा व्यवस्थेचे पाईप बहुतेक तुटले असावेत. ते पाणी इतक्या जोरात होते की आम्हाला बाजूच्या पाइपला पकडून उतरावे लागत होते. मग आम्ही हळूहळू खाली येत होतो तेव्हा आम्हाला सांगितले की हा जिना सुद्धा बदलायला लागेल. कारण तो खालून तुटला होता. आपत्कालीन जिन्याचा आधार आम्हाला घ्यावा लागला.

**ज्ञानेश्वर भाई :** तर, राम प्रकाश भाई आपल्याला दुसरा जिना सुद्धा जेव्हा बदलायला सांगितला तेव्हा सर्वांचीच भयभीत अवस्था झाली असणार नाही? आपण राजयोग साधना करता त्यामुळे आपण शांत होता. परंतु भीती तर शेवटी वाटतेच ना? पुढे अजून काय झाले? मी कल्पना करू शकतो की सर्वांनाच तेव्हा धास्ती वाटली असेल आपण अजून त्याबद्दल काही सांगू शकाल तर खूप छान होईल.

**रामप्रकाश भाई :** जेव्हा दूसरा टॉवर पडला तेव्हा आम्ही ज्या पहिल्या टॉवरमध्ये होतो तो सुद्धा खूप हलला. जमिनीला भेगा गेल्या. प्रकाश योजना बंद झाली. भिंतींच्या प्लास्टरचे तुकडे निखळले.

**ज्ञानेश्वर भाई :** सर्व पळापळ सुरू होती. घायाळ लोक पण सोबत होते आणि पाणी सुद्धा जमायला लागले. असे हृदयद्रावक दृश्य समोर होते. जेव्हा तुम्ही तिसऱ्या जिन्याकडे गेला तेव्हा अंदाजाने किती लोक होते?

**रामप्रकाश भाई :** पूर्ण जिनाच लोकांनी भरला होता. काही ऑफिसचे लोक होते, काही अनोळखी लोक होते. बचाव कार्य करणाऱ्या लोकांनी तेव्हा सांगितले की तिसऱ्या जिन्यावरून जायचे आहे. चिंता करू नका. तुम्हाला आम्ही बाहेर काढू. पण जसे कॉरिडॉर मध्ये गेलो तेव्हा तेथे काळाकुट्ट अंधार होता. प्रथमच कळले की काळाकुट्ट अंधार कसा असतो. वरून पाणी पडत होते. भिंतीचा आधार घेऊन लोक पुढे जात होते. मध्ये फक्त आपत्कालीन प्रकाश केव्हातरी चमकायचा. तेव्हा कळले सगळ्या वायर्स

डोक्यावर लटकत होत्या. शेवटी तिसऱ्या जिन्यावरून आम्ही हळूहळू खाली आलो.

**ज्ञानेश्वर भाई :** अच्छा राम प्रकाश भाई, आता एक प्रश्न माझ्या मनात आहे. तुम्ही म्हणता की तुम्ही ध्यान-धारणा करता परंतु इतकं सखोल मेडिटेशन करून सुद्धा मनुष्य अशा परिस्थितीत कधीतरी घाबरतो. तर त्यावेळेस आपल्या मनात काय भावना होती? कोणते विचार होते? काही भीती गोंधळ होता का?

**रामप्रकाश भाई :** मी आज जेव्हा मागे वळून पाहतो तेव्हा कळते की त्या क्षणाला एक सेकंद सुद्धा मला भीती वाटली नव्हती. मला खूप आश्चर्य वाटते. विचार करतो, की काय कारण असेल? असे तर काही नाही की मी एकदम धाडसी आणि धीट माणूस आहे. साधारण माणूस आहे. कोणाशी भांडत नाही. परंतु त्या क्षणाला मला अजिबात भीती वाटली नाही. असो. विचार करतो तेव्हा एक गोष्ट ध्यानात येते की मला दुसऱ्यांची मदत करायची खूप हौस आहे आणि आवड आहे. मी अठ्ठावीस वर्षांपासून राजयोग साधना करत आहे. मग अशा वेळेस या ईश्वरी ज्ञानाचा उपयोग केला नाही, तर मग केव्हा करणार? मला हीच आस होती. सर्व लोक घाई गडबडीत उतरत होते, तेव्हा मी स्थिर मनाने उतरत होतो.

**ज्ञानेश्वर भाई :** अच्छा अच्छा!!

**रामप्रकाश भाई :** सर्वांचे चेहरे भीतीने ग्रासले होते. प्रचंड टेन्शन सर्वांच्या चेहऱ्यावर होते. मी इतरांना पुढे पुढे करून मागे चालत होतो. सांगत होतो की आपण सर्व एकदमच जिना उतरून खाली पोचणार.

**ज्ञानेश्वर भाई :** अरे वा!!

**रामप्रकाश भाई :** माझा परमेश्वरावर पूर्ण विश्वास आहे.

**ज्ञानेश्वर भाई :** लोकांना माहिती सर्व असते. ज्ञान असते. पण जेव्हा परिस्थिती समोर उभी असते त्यावेळेस या ज्ञानाचा उपयोग केला तरच त्या परिस्थितीतून बाहेर पडू शकतो. आपण आपल्या ज्ञानाचा, राजयोगशक्तीचा अतिशय चांगला उपयोग केलात आणि या सर्व परिस्थितीत वाईटातून चांगला मार्ग काढला. स्वतःची परीक्षा करू शकलात. आपण सफल झालात. सर्व लोकांचा धीर वाढवून त्यांना या परिस्थितीतून बाहेर काढलं. स्वतःचा जीव धोक्यात घालून तुम्ही इतरांना पुढे केलं. खूप मोठी सेवा तुम्ही केलीत.

**रामप्रकाश भाई :** मी अजून एक गोष्ट तुम्हाला सांगतो. जेव्हा मी बाकीच्यांना माझ्यापुढे करून स्वतः मागे राहत होतो, ती गोष्ट त्यांना एवढी आवडली की सर्वांनी प्रेमाने मला एंजल म्हटले. फरिश्ता स्वरूप, देवतास्वरूप म्हटले. त्यामुळे मला असे वाटते की संकट समयी आपण दोन पाऊले पुढे जाऊन जगाला मदतीचा हात दिलात तर जग आपल्याला देवता मानणार. खूप प्रेम मिळते सर्वांचे. संकटसमयी तुमची छोटीशी मदत सुद्धा फार मोठा परिणाम घडवून आणते. तुम्हाला त्याचे फळ कित्येक पटीत मिळते.

**ज्ञानेश्वर भाई :** बहुत खुब!! बिल्कुल सही! पुढे ऐकण्याची उत्सुकता आम्हाला खूप आहे.

राम प्रकाश भाई, तुम्ही मार्ग काढत, आपत्तीवर मात करत खाली उतरण्यास सुरुवात केली त्यानंतर काय झाले?

**रामप्रकाश भाई :** मी एक गोष्ट सांगू इच्छितो, जेव्हा संकट येते तेव्हा ईश्वराचे स्मरण करावे असे आपण म्हणतो परंतु त्यावेळेस ते स्मरण सुद्धा भय आणि शंकायुक्त असते. किंवा आपण स्वतःला दोषी ठरवत असतो. पूर्ण जीवनपट समोर उभा राहतो. या घटनेच्या एक दोन महिन्यापूर्वी पासून मला असे भासायचे की मी आंतरिक शांती आणि आनंद हे गुण माझ्या चहुबाजूंस पसरवत जातोय. मला विश्वास आहे की निसर्ग आपणास काही दुःख देऊ इच्छित नसतो. मला असे सतत जाणवत होते की मी स्वतःला शांती आणि आनंद या ईश्वरी गुणांनी भरपूर केल्यामुळे इतरांची जशी अवस्था होती की डोळे लाल झाले होते, पाणी येत होते, घाबरले होते तशी अवस्था माझी नव्हती. माझ्यावर त्या परिस्थितीचा एवढा परिणाम झाला नव्हता. त्याचे कारण मला आता उमगले की संकटात आपण अविचल राहिलो, तर आपला श्वासोच्छ्वास सुद्धा शांतपणे चालू असतो. त्यामुळे तेथील धुळीचा सुद्धा मला इतका त्रास झाला नाही.

**ज्ञानेश्वर भाई :** अच्छा अच्छा! बरं पुढे काय झाले?

**रामप्रकाश भाई :** आम्ही सर्वांबरोबर तिसऱ्या जिन्यापर्यंत आलो. सर्व अंधारातूनच वाट काढत होते. पण एकदा तिसऱ्या जिन्यावर आल्यावर पटापट आम्ही खाली उतरण्यास सुरुवात केली. आणि खाली येऊन बाहेर निघालो. तेव्हा पाहिले वरून सर्व इमारतीचे तुकडे खाली पडत होते. त्यातून स्वतःला वाचवत वाचवत आम्ही बाहेर येऊन पाचच मिनिटे झाली असतील, तेव्हा वाटले जमीन हलते आहे. मागे पाहिले, तर आमचा टॉवर सुद्धा खाली कोसळत होता.

(पृष्ठ क्र.२८ वर)



# काळ सार्थकचि लावावा

ब्र.कु. चंद्रशेखर, बी.के. कॉलनी, आबू रोड

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखं नररत्न या देशाला लाभलं हे खरोखरच मोठं भाग्य आहे. बाबासाहेबांच्या जीवनातून अनेक गोष्टी शिकता येण्यासारख्या आहेत. ते इंग्लंडमध्ये शिकत असताना घडलेली एक घटना आहे. आर्थिक मदत तुटपुंजी असल्याकारणाने कित्येकदा ते एक कप चहा व एक-दोन पावाचे तुकडे खाऊन दिवस काढीत. त्या दरम्यान कुणी मित्र त्यांचेकडे येत व म्हणत 'चला आज अमक्या ठिकाणी फिरायला जाऊ, मजा करू.' त्यावर डॉ. बाबासाहेबांचे उत्तर असे. व्यर्थ दवडायला माझ्याकडे वेळ आणि पैसा दोन्ही नाही, तुम्ही आपले जा आणि मजा करा.' अशा प्रकारे हालअपेष्टा सहन करून उदयास आलेले बाबासाहेब, जीवनभर वेळेचा सदुपयोग करत राहिले. कुठल्याही सभासमारंभात कंटाळवाणी भाषणे सुरू झाली की बाबासाहेब जवळचे एखादे पुस्तक काढून वाचू लागत व त्यात बुडून जात.

आता सहामाही परीक्षा संपल्या, सुट्ट्या लागल्या. शालेय विद्यार्थ्यांना तर वेळच वेळ आहे. मग कसकसा वेळ घालवता येईल? अनेक पर्याय आहेत. सहज सोपा म्हणजे वाचनाचा छंद जोपासणे, मुलेही हल्ली वॉटस ॲप, फेसबुक सारख्या माध्यमांतून बरेच काही वाचत असतात. त्याऐवजी पुस्तकें वाचली तर? बरेच फायदे त्यात दडलेले आहेत. एक म्हणजे इलेक्ट्रॉनिक पडद्यामुळे (स्क्रीनमुळे) डोळे खराब होतात. ते टळेल. दुसरं म्हणजे बरीच माहिती पुस्तकांतून उपलब्ध होते व ती इतरत्र मिळण्याची शक्यता कमीच. सगळ्यांच प्रश्नांची उत्तरं काही 'गुगलबाबा' नाही देऊ शकत. पुस्तकं वाचनाचा अजून एक फायदा आहे तो म्हणजे आपलं मन जास्त चांगले एकाग्र होऊ शकतं.

अनेक पालक आपल्या मुलांना चांगल्या उपक्रमांमध्ये गुंतवतातही. कुणी पोहायला जातं, कुणी संस्कारवर्गात, तर कुणी नाट्याभिनय वर्गात. थोडक्यात काय तर शालेय वर्षभरात एखादी गोष्ट करता येत नाही ती या दिवसात शिकणे वा करणे यासारखी चांगली गोष्ट नाही. शिक्षकी पेशा पत्करलेल्या नागरिकांना तर ही एक सुवर्णसंधी ठरू शकते. आपण शिकवित असलेल्या विषयात अधिक रस कसा निर्माण करता येईल. त्यात वैविध्य कसं आणता येईल. याकरिता प्रयत्न करता येतो का ते पहावं. माझ्या माहितीतल्या प्राध्यापकांनी तर निवृत्तीनंतर शिक्षकांचेच वर्ग घ्यावयास सुरुवात केली. गणित कसे शिकवायचे व शिकवताना काय गोष्टी टाळायच्या याचे वर्ग सुरू केले. ज्याने त्याने ठरवावे आपण काय करू शकतो.

कितीतरी वेळा आपण अशी सबब देतो की काय करू वेळच नाही. रोजच्या धबडग्यात कुठनं मिळतोय वेळ? पण काही प्रेरणादायी उदाहरणं बघितलं की जाणवतं आपल्याला काय करायला हवं. अमेरिकेचे माजी उपाध्यक्ष 'हेन्री विल्सन' ह्यांनी वयाची २१ वर्षें पूर्ण होईपर्यंत एक हजार पुस्तकं वाचून पूर्ण केली होती. जपानी शेतकरी, शेतीत काम करताना जर खूप जोराचा पाऊस आला तर आडोशाला जातात. पावसाचा जोम ओसरेपर्यंत आडोशाला बसून टोपल्या विणतात.

गॅलिलिओ वैद्य होता, खगोलतज्ज्ञही होता. एक रुग्ण औषध घेऊन गेल्यावर दुसरा येईपर्यंत तो काहीतरी प्रयोग करीत राही.

वेळेचे मूल्य ज्यांनी जाणले, त्यांचे मूल्य वाढतच गेले असे दिसून येते.

मुलांना चांगल्या गोष्टीत आतापासूनच व्यग्र (व्यस्त नव्हे) ठेवलं तर वेळेचा सदुपयोग करण्याची सवय त्यांच्यात विकसित करता येईल. मुंबईत राहणाऱ्या मुलांना 'नेहरू सायन्स सेंटर, नेहरू प्लॅनेटोरियम' सारख्या उत्तम ठिकाणी नेता येईल. राजा शिवाजी संग्रहालय (पूर्वाश्रमीचे प्रिन्स

ऑफ वेल्स म्युझियम) तर एका दिवसांत पूर्ण बघून होतही नाही.

श्री. अरविंद गुप्तांनी एक छान उपक्रम गेली काही वर्षे राबवत ठेवलाय. टाकाऊ वस्तुंपासून सोपीसोपी खेळणी बनवायची. ही खेळणी मुलांनाच बनवायची संधी व आनंद मिळतो. खेळणी मोडून पुन्हा पुन्हा जोडताही येतात. याद्वारे विज्ञानही शिकता येतं व मनोरंजनही होतं. आगपेटीच्या काड्या, रबर बॅण्ड, सायकलची व्हॉल्व्ह ट्युब अशा किरकोळ गोष्टींद्वारे अनेक खेळणी बनवता येतात. हे पालकांना व मुलांना आनंददायक ठरू शकतं. यातून अजून एक फायदा होतो तो म्हणजे, मुलं व पालक यांतील सुसंवाद वाढून भावनिक बंधही दृढ होऊ शकतो.

थोडक्यात काय तर वेळेचा सदुपयोग करणं हे आपल्या हातात आहे. गेलेला काळ काही पुन्हा मिळवता येत नाही म्हणूनच समर्थ रामदासस्वामींनी म्हटलंय, अभ्यासचि करीत जावा । काळ सार्थकचि लावावा ।।

सांप्रत समय, पुरुषोत्तम संगमयुगाचा आहे. स्वतः परमात्मा शिव अवतरित होऊन दिव्य ज्ञान देत आहे ते धारण करणे म्हणजेच काळ सार्थक करणे. आपल्या हाती असलेला वेळ सफल झाला की आनंद वाटतो आणि आनंदाची अनुभूती म्हणजे दिवाळी.

सर्व वाचकांना आगामी दिवाळीच्या शुभेच्छा !

***

---

(पृष्ठ क्र.२१ वरुन)
शकतात. चांगले शब्द सर्जनशील असतात. तसं पाहिले तर चांगल्या शब्दाला किंमत असते. तशी एक म्हण पण प्रचलित आहे, ती म्हणजे मोजून आणि मापून बोलणे.

मोजून मापून बोललेले शब्द चांगल्या विचाराचे असतात, मानवाला प्रेरणादायक बनवतात.

प्रत्येक वेळी आपण असा विचार करतो की मी व्यासपीठावर आहे असे काही नाही आणि आपण जे बोललो ते सर्व खरे असतेच असेही नाही. परंतु यातून आपण आपली प्रतिमा चांगली राखण्याचा प्रयत्न करतो.

आपल्या मातृभाषेमध्ये प्रत्येक शब्दाबद्दल लिहिले आहे की, शब्द नेहमी विचार करून बोलावेत. शब्दाला हात नाही ना पाय नाही; पण शब्द नेहमी औषधाच्या मात्रेप्रमाणे वापरा. वाईट शब्दामुळे कोणालाही दुःखी करू नये. शब्द नेहमी जपूनच वापरावेत. चांगले शब्द मनाला प्रसन्न करतात तर वाईट शब्द मनाला दुःखी करतात. त्यातही काही शब्द मान शान पण वाढवतात. नेहमी मन प्रसन्न करणारे शब्दच वापरावेत. कारण एकदा का तोंडातून शब्द निघाला तर तो परत घेता येत नाही. म्हणून असे शब्द वापरा ज्याने मन नेहमी प्रसन्न राहील.

शब्द एक प्रकारचे जेवणच आहे. कोणत्या वेळेला कोणता शब्द वापरावयाचा हे जर चांगल्या प्रकारे समजले, तर जगामध्ये त्याच्यापेक्षा मोठा स्वयंपाकी (आचारी) नाही.

शब्दाला सुद्धा धार असते. बोलण्या अगोदर व्यवस्थित विचार करावा. जर तो शब्द स्वतःला चांगला वाटत नसेल तर तो दुसऱ्याला कसा चांगला वाटेल?

जो चांगल्या शब्दांचा वापर आपल्या जीवनात करतो त्याचे जीवन सुंदर बनते. चांगले शब्द मनाला आनंदी बनवतात. जेव्हा आपण परमेश्वराच्या आठवणीत बोलतो तेव्हा आपल्याला ईश्वरी शक्ती मिळते. असेच सुंदर शब्द, चांगले शब्द ऐकणाऱ्याला प्रसन्न करतात. संत ज्ञानेश्वर म्हणतात,

**साच आणि मवाळ**
**मितुले आणि रसाळ**
**शब्द जैसे कल्लोळ**
**अमृताचे (ज्ञानेश्वरी अ. १३ ओवी २६९)**

माणसाचे शब्द अमृताचा वर्षाव करणारे असावे.

जेव्हा जेव्हा तुम्ही चांगली पुस्तके वाचाल तितके चांगले शब्द तुमच्या भाषेत/वापरात येतील. खरी समज चांगल्या शब्दाच्या माध्यमातूनच मिळते. शब्द ही व्यक्तीची संपत्ती आहे. भलेही धन संपदा नसेल परंतु चांगल्या शब्दाची संपत्ती भरपूर असावी.

जर शब्द सत्य असतील, तर ती व्यक्ती स्वतःला भाररहित अनुभव करते. जर शब्दच खोटे असतील तर आपली स्मरणशक्ती चांगली असली पाहिजे. खोटे बोलणाऱ्याच्या मनावर सूक्ष्म दडपण असते. चांगले शब्दच माणसाची दौलत आहे, संपत्ती आहे. याची कोणीही चोरी करू शकत नाही. आपण आपल्या शब्दाचा वापर दुसऱ्याच्या कल्याणासाठी करा.

***



# क्रोध

ब्र.कु.पुष्पा, नाशिक

'सहसा विदधित् न क्रियाम् अविवेक: परमापदाम पदम् ।'

म्हणजे कोणतेही कार्य अविचाराने करू नये. विवेकहीनता आपत्तीचे आश्रयस्थान आहे. याबाबत एक गोष्ट सांगितली जाते. एका राजाने आपल्या मंत्रिमंडळातील सर्व बुद्धिवान लोकांना सांगितले, 'मला जीवनभर कधीही कामी येईल असा एक विचार सांगा आणि सर्वानुमते हे सुभाषित राजाला सांगण्यात आले. राजालाही ते पटले आणि त्याने आपल्या शयनकक्षात मोठ्या अक्षरात ते लिहून ठेवले होते. पुढे एकदा लहान राजपुत्र हरवला आणि खूप शोध घेऊनही मिळाला नाही. त्याचं काही बरं-वाईट झालं असावं अशी सगळ्यांनी समजूत करून घेतली. कालांतराने मुलगा मिळतो तेव्हा त्याचे वय सोळा-सतरा वर्षाचे झालेले असते. इतक्या वर्षांनंतर तो प्रेमाने आपल्या आईच्या कुशीत झोपतो; पण कामानिमित्त बाहेर गेलेल्या राजाला ही घटना माहीत नसते. आपल्या पत्नीसोबत हा कोण तरुण झोपलाय ते पाहून त्याच्या मनात पत्नीच्या चारित्र्याबद्दल संशय निर्माण होतो. तलवार उपासतो आणि त्याचे लक्ष समोरच्या भिंतीवर लिहिलेल्या सुभाषितावर जाते. मग तो विचार करतो आणि ठरवतो की लगेच कुठलीही कृती करणे योग्य नाही. पुढे त्याचा गैरसमज दूर होतो आणि त्याला लक्षात येते, आपण एका मोठ्या दुष्कृत्यातून या एका विचारामुळे वाचलो.

तात्पर्य - अविचाराने घातच होतो.

अध्यात्मात मुख्य पाच विकार म्हणजे काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार हे महत्त्वाचे शत्रू मानले आहेत. त्यासोबत काही जण आळस आणि मत्सरासारखे विकारही तितकेच मोठे मानतात. आज आपण क्रोध या विकाराबाबत विचार करूया. क्रोधामुळे विवेक नष्ट होतो हे आपण जाणतोच. माणसाच्या मोठ्या शत्रूंपैकी एक क्रोध आहे. मनांत दबलेला काम विकार, क्रोधाच्या रूपात बाहेर पडतो आणि अहंकारही क्रोधाच्या रूपात बाहेर पडतो. माणसास आतून जाळणारा विकार म्हणजे क्रोध. कुठेतरी वाचल्याचे स्मरते - दुसऱ्यावर रागावणे म्हणजे स्वतः विष खाऊन दुसऱ्याच्या मरणाची वाट पाहणे. रागीट माणसाच्या संपर्कात येणाऱ्या लोकांवरही क्रोधाचा परिणाम होतो.

रागावण्यामुळे माणसाच्या शरीरावरही अनिष्ट परिणाम होतो हे वैद्यकीय सत्य आहे. हृदयाचे ठोके वाढतात, रक्तदाब वाढतो, शरीरातील पित्त खवळते (ॲसिडिटी वाढते), ॲड्रिनॅलीन नावाचे संप्रेरक स्रवते असे अनेक परिणाम घडतात. रागावण्यामुळे हृदयविकार, पक्षाघात, अर्धशिशी यासारखे दीर्घकालीन आजारही जडू शकतात. ज्यावेळी एखादा माणूस रागावतो, तेव्हा आजूबाजूचे वातावरणही तणावपूर्ण बनते. संत नामदेवांनी तर छान लिहून ठेवलंय-'क्रोधी जाणावा भोवयासी गाठी' म्हणजे कपाळावरच्या आठ्या किंवा चढलेल्या भुवया, माणसाच्या क्रोधी स्वभावाचा परिचय देतात, मग तो माणूस बोलो वा न बोलो.

काही वेळेस अतिशय क्षुल्लक कारणावरून भांडण होते आणि माणूस टोकाची भूमिका घेतो. हातून एखादा मोठा गुन्हादेखील घडतो. अनेक शहरात असलेल्या कारागृहात, गेली अनेक वर्षेबंदी बांधवांची सेवा ब्रह्माकुमारी संस्था करत आहे. कारागृहातल्या बंदी बांधवांना राजयोगाचे प्रशिक्षण देऊन त्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडत आहे. तेथील बांधवांशी बोलताना जाणवते, ही माणसे इतकी चांगली बोलतायत आणि यांच्या हातून असा मोठा अपराध कसा काय घडला असेल? खरंच वाटत नाही. 'अति राग अन भीक माग' असे म्हणतात. भीक मागणे म्हणजे प्रेमाची, सन्मानाची याचना करणे याअर्थी आहे. रागावणाऱ्या प्रत्येक माणसाला केलेल्या कृत्याबद्दल पश्चाताप होतो हे नक्की आहे. झालेला पश्चाताप अहंकारापोटी मान्य करणे किंवा न करणे हे ज्याच्या त्याच्या हाती आहे.

एखादी साधी घटना पहा ना! एका बसमधल्या

प्रवासात सुरुवातीच्या स्थानकावरच पाच पन्नास रुपयांच्या तिकिटासाठी एकाने पाचशे रुपयाची नोट कंडक्टरकडे दिली. कंडक्टरकडेही सुटे पैसे नव्हते. यावरून प्रवासी रागावून कंडक्टरला अद्वातद्वा बोलतो. शेवटी प्रकरण पुढील थांब्यावर पोलीस चौकीवर जाते आणि उलट सुलट बोलणाऱ्या प्रवाशास चांगला प्रसाद पोलिसांकडून मिळतो. याच ठिकाणी जर त्या प्रवाशाने शांतपणे इतर प्रवाशांकडे विचारणा केली असती, थोडा समंजसपणा दाखवला असता, तर नंतरचा गोंधळ झाला नसता. थोडक्यात काय तर जरासा शांतपणा, संयम बाळगला तर परिणाम बदलू शकले असते.

क्रोधावर विजय मिळवण्यासाठी काही भौतिक पातळीवरचे उपाय सुचवले जातात जसे,

१) ज्यावेळी राग येतो त्यावेळी उलट्या क्रमाने १०० ते १ किंवा १० ते १ असे अंक मोजावे.
२) ज्यावेळी राग येतो तेव्हा थोडं पाणी प्यावं.
३) शक्य असल्यास रागाचा भर वाढण्याची परिस्थिती दिसू लागताच काही काळ तिथून दूर जावे. थोडा मोकळा श्वास घ्यावा. दीर्घ श्वास घेण्याचा अभ्यास करावा.
४) दीर्घ मुदतीसाठी तामसिक पदार्थ टाळावेत जसे– मांसाहार, कांदा–लसूण यासारखे पदार्थ टाळावेत.

आयुष्यभराकरिता आपल्या वागण्यात बदल करण्याच्या हेतूनेराजयोगाचाखूपफायदाहोतो.

राजयोगाच्या अभ्यासात काही विशेष पद्धतीचे सकारात्मक विचार करण्याकडे भर दिला जातो. उदा. असे समजावे हे एक मोठे विश्वव्यापी नाटक आहे. यात प्रत्येकाची एक सुनिश्चित भूमिका आहे. तटस्थ भूमिकेतून पाहिले, तर प्रत्येकाच्या अभिनयाकडे पाहून राग येण्याचे प्रमाण कमी होईल.

मी एक शांत स्वरूप आत्मा आहे. या देहापासून वेगळा आहे. या विचारावर सखोलपणे विचारमंथन ब्राह्ममुहूर्तावर करायलाशिकवलेजाते.

असे वेगवेगळ्या प्रकारे क्रोधावर विजय मिळवण्या– करिता उपाय सुचवले जातात. त्यावर गरज पडल्यास व्यक्तिगत मार्गदर्शन केले जाते.

***

---

(पृष्ठ क्र.२४ वरुन)

आम्ही त्या टॉवरच्या इतक्या जवळ होतो की तो आमच्या बाजूने कोसळला असता तर आम्ही सर्व त्या टॉवर खाली गाडले गेलो असतो. पण टॉवर एकदम सरळ रेषेत खाली आला, त्यामुळे आम्ही वाचलो.

**ज्ञानेश्वर भाई :** अच्छा आता सांगा हे सर्व भयप्रद आहे, थ्रिलिंग तर नाही. पण ऐकताना मनाचा थरकाप उडतो. ह्या सर्व लोकांमधून सर्व वाचले का?

**रामप्रकाश भाई :** जेवढे जिन्यावरून खाली आले ते सर्व वाचले; पण जे लोक वरच राहिले किंवा ज्यांनी वर राहणे पसंत केले, त्यांच्यापैकी किती वाचले ते कल्पना नाही.

**ज्ञानेश्वर भाई :** हा सर्व समाचार अगदी विस्तारात काही कळू शकला नसेल. पण सर्व प्रसंग खूप मोठा आहे. त्याच्या अगदी विस्तारात जाण्यात काही अर्थ नाही. ते सतत उगाळत बसणं सुद्धा चांगले नाही. पण हे ऐकण्या मागे एक उद्देश आहे की, अशी संकटे आयुष्यात नेहमी येत असतात. असे अतिरेकी हल्ले सर्व जगाला हादरवून सोडतात. भयावह आहे. पण हा विषय सोडून देणे योग्य. मी फक्त एका दृष्टिकोनातून पाहतो की रामप्रकाश भाईंच्या संभाषणातून काही मूल्यवान गोष्टी शिकायला मिळाल्या. या अशा परिस्थितीत आपली बुद्धी स्थिर ठेवून दुसऱ्यांची मदत कशी करू शकतो हे रामप्रकाश भाईंच्या वर्तनावरून समजते.

**रामप्रकाश भाई :** हो, अगदी बरोबर. मला एक गोष्ट अजून सांगावीशी वाटते. आम्ही खाली बाहेर आल्यानंतर बरेच लोक आपापल्या वाटेने गेले. पण काही लोक म्हणाले राम, आम्ही तुमच्या बरोबरच राहू इच्छितो. कारण त्यांना माझ्यावर विश्वास होता. आमचे जवळच मॅनहॅटनला मेडिटेशन सेंटर आहे. तिथे येण्यासाठी मी काहीजणांना विनंती केली. काही लोक माझ्यासोबत सेंटरवर आले. मी त्यांना जेवण इत्यादी सोयी करून दिल्या. त्यांना खूपच छान वाटले. थोडावेळ मेडिटेशन पण केले. मला पण खूप छान वाटले की त्यांचा माझ्यावर विश्वास आहे. पण सर्व प्रसंगाचे सार म्हणजे मी हेच अनुभवले की जर आपली मन:स्थिती एकदम सुंदर, मजबूत असेल तर आपण सर्वांना कशी मदत करू शकतो. रात्री जेव्हा ट्रेन चालू झाल्या तेव्हा आम्ही सर्व आपापल्या घरी गेलो.

**ज्ञानेश्वर भाई :** मित्रांनो, राम प्रकाशभाई यांच्या अनुभवावरून हेच समजते की आपण आपली बुद्धी आणि मन स्थिर आणि शांत ठेवले तर आपण दुसऱ्यांची मदत निश्चितच करू शकतो. होणार असते ते आपण टाळू शकत नाही परंतु मन सक्षम ठेवल्याचे फायदे, तर नक्की अनुभवू शकतो. नमस्कार.

***




ठाणे (पू) : इयत्ता १०वी मध्ये चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करताना भ्रा. पांडे सर, बाजूला भ्रा. बालानी सर, समाजसेविका दादी वीणा भाटिया, ब्र.कु. मीनाक्षी.



भिलवडी (सांगली) : शिक्षक दिनानिमित्त कार्यक्रमाचे दीप प्रज्ज्वलन करताना माजी सरपंच सपना मॅडम, घारगे मॅडम, प्राध्यापक, भ्रा. धनंजय पाटील, ब्र.कु. निवेदिता, ब्र.कु. मीरा व अन्य मान्यवर.



पिंपरी (पुणे) : स्वातंत्र्य दिवस साजरा करताना ब्र.कु. सुरेखा व महानगर पालिकेचे सर्व कर्मचारी



रविवारपेठ (पुणे) : सेवा गणेश मित्र मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष भ्रा. शिरीष मोहिते यांस ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र. कु. रोहिणी



जिंतूर : फिल्म अभिनेता अनिल मोरे यांना राखी बांधताना ब्र.कु. सोनू



जकात वाडी (सातारा) : उपअभियंता, भ्रा. महादेव चव्हाण यांना ईश्वरी भेटवस्तू देताता ब्र.कु. शांता

Registration No. : MAHMAR/2007/21914



शांतीवन (आबू रोड) – नवनिर्वाचित राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांस ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र.कु. शिविका, ब्र.कु. मृत्युंजय



मुलुंड : ध्वजारोहण झाल्यानंतर ग्रुप फोटोत राजयोगिनी ब्र.कु. गोदावरी दीदी, ब्र.कु. वर्षा, वरिष्ठ पो.नि. भ्रा. कोथिंबीरे, समाजसेवक आनंद सबाडे व अन्य



ठाणे चेकनाका – महाराष्ट्राचे मुख्यमंत्री भ्रा. एकनाथ शिंदे यांना राखी बांधताना ब्र.कु. सरला



नागपूर : सेवाकेंद्राच्या सुवर्ण महोत्सव कार्यक्रमात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री भ्रा. देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार करताना राजयोगिनी संतोष दीदी, ब्र.कु. रजनी व अन्य मान्यवर



वाशी : आमदार भ्रा. गणेश नाईक यांना ईश्वरी संदेश दिल्यानंतर ग्रुप फोटोत ब्र.कु. शीला, नगरसेवक भ्रा. प्रकाश मोरे व अन्य



शेगाव : म्युझियमचे अवलोकन केल्यानंतर ग्रुप फोटोत रेल्वे प्रबंधक भ्रा. फुंडकर, उद्योजक भ्रा. नागपाल, ब्र.कु. शारदा व अन्य मान्यवर